# शहराची कारभारीण

नगरसेविका व राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण करू पाहणाऱ्या महिलांसाठी...

अंक - दुसरा, क्रमांक - २, जानेवारी २०१३ (खाजगी वितरणासाठी)

## सावित्रीची ओवी

पहिली माझी ओवी गं, सावित्रीच्या बुध्दीला
स्त्रियांच्या शिक्षणाचा, पाया तू घातला
अशिक्षित अडाणी तू पतीपाशी शिकली
मुलींसाठी पहिली शाळा तुम्ही काढली...

दुसरी ओवी गायीली, तुझ्या ग धैर्याला,
दगडगोटे खाऊनी, चालवली तू शाळा,
घराबाहेर काढले, गुंडांनी अडविले,
धीराने तोंड दिले, सगळ्या त्रासाला...

तिसरी माझी ओवी गं, तुझ्या मोठ्या मनाला,
फसलेल्या विधवेचा, सांभाळ तू केला,
अनाथ नी अबलांचे, मायबाप होऊनी
यशवंत बाळाला, दत्तक घेतला...

चौथी ओवी गायली, तुझ्या थोर हृदयाला
माणुसकीचा झरा ज्यात, नित्य गं वाहिला
ज्योतिबांची सावली, नाही तू राहिली,
सत्यधर्म प्रकाशात, तेजानं तळपली

दुःखितांच्या सेवेत, देह तू ठेविला,
स्मरण तुझे करूनी, वसा मी घेतला
भगिनींना जागवीन, संघटित करीन
ज्ञानज्योत लावीन, हेच तुला नमनं...

वसुधा सरदार

टाटा सामाजिक विज्ञान संस्था

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था

महाराष्ट्र महिला परिषद




**।। कारभारणींचा नवा दागिना, ताठ मान-ताठ कणा ।।**

# मानपत्र

आज आम्ही,

मानीय **श्रीमती मालती सगने**

राहाणार **चंद्रपूर** यांना हे मानपत्र सन्मानाने देत आहोत.

**श्रीमती मालती सगने** आपण लोकहिताचे राजकारण मनापासून करीत आहात. महिलांसह गरीबाला सन्मानाने जगता यावं, हे ध्येय तुम्ही समोर ठेवले आहे. विरोधकांसह सर्व मतदारांशी तुम्ही जिव्हाळयाचा व्यवहार ठेवण्याचा मनापासून प्रयत्न करीत आहात.

धर्म, जात, लिंग, भाषा, वर्ग हे भेद मतदारांसाठी काम करत असताना आड येत नाहीत. समतेचे उद्दीष्ट ठेवून तुम्ही सामाजिक कार्य करीत आहात.

इतकेचं नव्हे तर मतदारसंघाला योग्य न्याय मिळावा, म्हणुन तुम्ही स्वतःच्या कारभार क्षमता वाढविण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहात.

छोटे-माठे यश व अपयश पचवत तुम्ही विकासाचा नवा पत्ता - अर्ध्या महिला अर्धी सत्ता ही घोषणा आपण सार्थ ठरवाल अशी अपेक्षा आहे. स्थानिक लोकशाहीवर तुमचा विश्वास असून ती बळकट करण्यासाठी तुमचे प्रयत्न सुरू राहतील, असा विश्वास वाटतो.

तुमच्या या निःस्वार्थी योगदानाकरीता हे मानपत्र देताना आम्हाला आनंद होत आहे. तुमच्या या कष्टपूर्वक व सातत्याने टिकून राहण्याच्या या प्रयासाला आमचा निरंतर पाठिंबा व शुभेच्छा !

महाराष्ट्र महिला परिषद

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था

टाटा समाज विज्ञान संस्था

दिनांकः ३ जानेवारी २०१३ स्थळः मुंबई

# 'सन्मान कारभारणीचा'

# श्रीमती मालती सगने यांचा परिचय

मा. श्रीमती मालतीताई सगने या चंद्रपूर जिल्ह्यातील रहिवासी. अतिशय सामान्य कुटुंबात आपला जन्म झाला. रुढ अर्थाने वरच्या जातीमधील असून सुध्दा घरची परिस्थिती गरीब. मोलमजूरी केल्याशिवाय आपला उदरनिर्वाह होणे शक्य नव्हते. आपण एका लेखात उल्लेख केल्यानुसार 'लग्नापूर्वी आणि लग्नानंतरही' या परिस्थितीशी सामना करत आपली वयाची पस्तीस वर्ष गेली. त्यावेळी एक ध्यान्यात आले की जातीच्या पलिकडे जाऊन सर्व श्रीमंत लोक एक होतात. मात्र गरीब तसे एकत्र येत नाहीत.

बचतगटातून आर्थिक गरजा भागतील म्हणून आपण त्यात सहभागी झालात. त्यातूनच पुढे महाराष्ट्र विकास प्रतिष्ठान या संस्थेसोबत बचतगट बांधणी करणाऱ्या संघटिका म्हणून काम करु लागलात.

वर्ष २००० मध्ये महिला राजसता आंदोलनाचे पहिले अधिवेशन चंद्रपूरमध्ये सायगाटा येथे झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांकडून निवडून आलेल्या सुमारे दीड हजार महिला प्रतिनिधींच्या या परिषदेत आपण आपल्या संस्थेतर्फे स्वयंसेवक म्हणून उपस्थित होतात. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत मिळालेले ३३ % आरक्षण, म्हणजे परिवर्तन घडविण्याची मोठी संधी आहे हे आपल्याला या परिषदेतून मनोमन पटले.

तेव्हापासूनच आपण महिला राजसत्ता आंदोलनाच्या सक्रीय कार्यकर्त्या झालात आणि २००० साली ग्रामपंचायत निवडणूक लढवली. पॅनलमधील एक सदस्य म्हणून आपण तेव्हा उभ्या होतात. त्यानंतर सर्व पातळयांवर महिलांना समानतेने जगता यावे याकरिता महिला राजसत्ता आंदोलनाच्या एक प्रमुख कार्यकर्त्या तर आहातच तसेच राज्य निवडणूक आयोगासोबत क्रांती ज्योती प्रशिक्षणाचे आपण काम पहात आहात.

हे करत असताना सत्तेच्या राजकारणात शिरण्याकरिता ग्रामपंचायतीची निवडणूक लढवून सत्तेचा दरवाजा ठोठवायचा हे सुध्दा आपण ठरविले होते. त्या प्रेरणेनेच २००५ आणि २०१० ही ग्रामपंचायत निवडणूक आपण 'राजसत्ता आंदोलनाचे' पॅनेल म्हणून लढलात. समाजाला पुढे नेणाऱ्या पुरोगामी तत्त्वांपासून फारकत घ्यायची नाही. पैसा, दारु, मटण यांचा उपयोग करुन मते मिळवण्याच्या वाटेवर जायचे नाही हा आपला इरादा आपण पूर्णपणे पाळलात.

सत्तेच्या राजकारणात अजून आपला शिरकाव झाला नाही. मात्र या धडपडीच्या प्रक्रियेत महिला चळवळीत सहभागी झालेली स्त्री पुरुष कार्यकर्त्यांची एक फळी तयार होवू शकली. या कार्यकर्त्यांसह नवीन काळात कोणत्या नवीन व्यूहरचना घेऊन निवडणुकीत उतरले पाहिजे याचा विचार आपण लगेचच सुरु केला आहे.

आगामी काळात महिलांसाठी ५० % आरक्षण आहे. अशावेळी धडाडीने आणि स्वयंप्रेरणेने राजकारणात, समाजकारणात येऊ इच्छिणाऱ्या आपल्या सारख्या कार्यकर्तीला आमच्या अनंत शुभेच्छा

**नीला लिमये**
महाराष्ट्र महिला परिषद

''जात धर्मापेक्षाही वर्ग व्यवस्था जटील असून या व्यवस्थेला छेद दिल्याशिवाय आपला विकास अशक्य आहे याची जाणीव झाली. हे करताना कुटुंबापासून अनेक अडथळे पार करून वाटचाल करावी लागली. ही वाटचाल करीत असताना आता कुटुंबाला व इतरांनाही माझा अभिमान वाटतो. व्यवस्था बदलाचे हे स्वप्न वाटते तितके सोपे नाही. परंतु स्वतःच्या बदलापासून त्याची सुरूवात करणे अत्यंत गरजेचे आहे.''

**– श्रीमती मालती सगने**

आधार : महिला राजसत्ता आंदोलन विशेषांक, राजसत्तेतल्या कारभारणी

❑❑❑

**डॉ. जतीन मोदी**
अध्यक्ष, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**संपादक**

**रणजीत चव्हाण**
महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**संपादकीय मंडळ**

**डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर**
संचालिका, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**डॉ. (प्रा.) अमिता भिडे**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**स्मिता वायंगणकर**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**भारती शर्मा**
महाराष्ट्र महिला परिषद

**नीला लिमये**
महाराष्ट्र महिला परिषद

**भीम रासकर**
महिला राजसत्ता आंदोलन

**सीमा काकडे**
प्रयास, पुणे

**संपादक / प्रकाशक**
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था,
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
महाराष्ट्र महिला परिषद, मुंबई

**संपर्क**

**डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर**
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई
एम.एन.रॉय मानव संसाधन संकूल प्लॉट नं. ६,
एफ ब्लॉक, शासकीय वसाहती समोर,
इमारत क्र. ३२६, समोर, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. : ०२२-२६५७३७९५ / ९६
फॅक्स : २६५७ ३९७३

**टाटा सामाजिक विज्ञान संस्था**

**स्मिता वायंगणकर**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज
व्ही. एन. पुरव मार्ग, देवनार,
मुंबई - ४०० ०८८.
दूरध्वनी क्र.: ०२२-२५५२५३७५ / ७६

**महाराष्ट्र महिला परिषद**

**भारती शर्मा**
श्रमिक, रूम नं. ९३२/९३३/५५१
डी मार्ट च्या मागे, राजपाल हॉस्पिटल समोर,
सेक्टर - ७, कोपरखैराणे, नवी मुंबई -
४००७०९
दूरध्वनी क्र.: ०२२-२७५४४२१९ /
२७५४८२१२

**मुखपृष्ठ**
श्री. मुकुंद सावंत, टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**अंक जुळणी व मुद्रण**
एन.एस.डी. आर्ट, अंधेरी, मुंबई
२८३९३४५० / ५१

***नोंद* : सदर अंकातील लेख हे लेखकांची वैयक्तिक मते आहेत. संपादक / संपादक मंडळ / प्रकाशक आणि संबंधित तीनही संस्था लेखात दिलेल्या मतांशी सहमत असतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.**

# 'संपादकीय'

## क्रांतीज्योती सावित्री.... झिंदाबाद !

शहरी कारभारीणचे हे दुसरे पुष्प तुमच्या हाती देतांना तीन जानेवारी हा सावित्रीबाई फुलेंचा जन्मदीन सोबत घेऊन आला आहे. समस्त नगर सेविकांचा रास्त वारसा अभिमानाने सांगताना या निवडणूक न लढविलेल्या जनसेविका ! त्यांचा मानवावरील विश्वास व्यक्त करतांना त्या गुलाबाचे फूल या कवितेत सांगतात -

गुलाबाचे फूल आणि कन्हेरीचे
स्वरूप दोघांचे एक दिसे ।। १ ।।
डोंबकावळा तो नसे राजहंस
कृष्ण आणि कंस दूजे असे ।। २ ।।
तशी दोन्ही फुले असती वेगळी
योग्यता आगळी गुलाबाची ।। ३ ।।
गुलाबासारखा मानव हा प्राणी
सावित्रीची वाणी ध्यानी आणा ।। ४ ।।

समस्त मानवजातीला वंदन करून त्यांच्यासाठी झटलेल्या सावित्रीबाई फुलेंची ही मानवंदना. त्यांचा माणसावरचा विश्वास भाबडा नाही. कृष्ण आणि कंस यातील फरकही त्या वर्णन करतात. ''सावित्री दिसे घरोघरी - जोतीबांचा शोध जारी'' ही घोषणा महिलांना मानवाचा दर्जा देऊन पुरूषांना जोतीबा व्हायचे आजही आव्हान करते ! गावात .. शहरात .. तालुक्यातील महिला-मुलींवर होणारे अत्याचार महिला कारभारणींच्या अजेंड्यांवर एक नंबरला आले तर सावित्रीबाईंच्या काळापूर्वीही भेडसावणारी ही समस्या समूळ उपटून नष्ट करता येईल. प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेने निम्म्या कारभारणी या पक्ष संघटना, जात, वर्ग, धर्म विसरून एक झाल्या तर ''महिला अत्याचारमुक्त मतदार संघाचा'' विडा त्या उचलू शकतात. आपल्याच विभागातील माजी, निवडणूक लढलेल्या, बचतगट अध्यक्ष, अंगणवाडी सेविका, महिला मंडळ, प्रमुख अशा सर्वपक्षीय महिला आघाडी प्रमुख व पाठिंबा देणाऱ्या युवक युवतीची सावित्री ब्रिगेड प्रत्येक मतदार संघात तयार झाली तर सर्व यंत्रणांना ती जागं करील व गरज पडेल तिथे धावून जाईल. पोलीस स्टेशनच्या महिला दक्षता समित्या या फक्त चहा बैठका न करता मतदारसंघातील सर्व यंत्रणा तपासतील व कामाला लावतील.

या अंकातील सर्व माहिती, लेख व शहरी कारभारीण-नगरसेविकांना सावित्रीचा वसा व जनकल्याणाची त्यांची भूमिका बजावायला मदत करणार आहेत.

२९ ऑगस्ट १८६८ साली सावित्रीबाई जोतीबा फुलेंना नायगांवहून पत्र लिहीतात-

''नुकतीच वयात आलेली सारजानामे पोरीवर गणेश नामे ब्राम्हण पोराची प्रीती जडली असोन, त्यापासून तीन सहा महिने दिवस गेले आहेत. त्यांची गल्ली-बोळातून धींड काढून, ठार मारण्यास चाळविले होते. त्या लोकांस, इंग्रज सरकारचे भय दाखविले व मी त्यांना क्रूर कर्मापासून वळविले.''

- तेव्हाही सावित्रीबाईंना स्त्री अत्याचार मुक्तीसाठी झटावे लागले. त्यांचा वारसा मानणारे आपण सारे अत्याचार मुक्त मतदारसंघासाठी सावित्री ब्रिगेड निर्माण केली तर घरी दारी पुरूषांसाठी ज्योतीबा जागृती अभियान, महिलांचा सन्मान, करण्याचा कुटुंबाचा परिवार, नगरसेविकांना स्वतंत्रपणे काम करू देण्याचा जोडीदार पतीचा सन्मान, दरमहा सावित्रीगाथा पारायण तसेच पुरुष मंडळीसाठी जोतीबा आघाडी प्रत्येक मतदारसंघात उभी करता येईल. प्रत्येक ठिकाणी पाच महिलांची सावित्री ब्रिगेड व पाच मदत करणाऱ्या पुरूषांची जोतीबा आघाडी सुरू करून या, सर्व यंत्रणांचा व महिला अत्याचाराच्या प्रश्नाचा नीट अभ्यास करून कृतीचा नेमका कृती आराखडा मतदारसंघात भिंती भिंतीवर रंगवून कामाला लागू लोकांची नक्कीच खूप साथ मिळेल.

नुकतेच हरीयाणातील धानी ग्रामपंचायतीतील बत्तीस वर्षाच्या सरपंच ताई-सुषमा भादू यांनी नवऱ्याच्या परवानगीने स्वतःचा घुंगट बाजूला सारला. पंचायतीत काम करातना घुंघट मध्येच येतो म्हटल्यावर नवऱ्याने घुंघट हटवायला मंजूरी दिली. नंतर त्यांनी सर्व पंच महिलांनाही हीच युक्ती सांगितली. शेवटी ग्रामसभेतच घुंगट नको असा प्रस्ताव मांडला व तो मंजूरही करून घेतला.

शहरी कारभारणीच्या या सुषमाताई सारख्या नवसावित्रींना मानाचा मुजरा ! आपणा सर्वांनाही आपापल्या घरापासून पक्षापर्यंत जोतीबांची मनापासून साथ मिळो, या शुभेच्छासह - क्रांतीज्योती झिंदाबाद !

**भीम रासकर**
महिला राजसत्ता आंदोलन

❑❑❑

# अंतरंग


- **महानगरपालिका एक अवकाश** ५
  अर्थसंकल्प व नगरसेवकाची भूमिका
  *श्री. प्रकाश ओरपे, निवृत्त उपसंचालक, नगरपरिषद प्रशासन संचनालय, महाराष्ट्र शासन*

- **विशेष लेख** ७
  शहरी गरिबी : कारभारणींसाठी संधी व आव्हाने
  *डॉ. (प्रा.) अमिता भिडे, टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई*

- **संवाद कारभारणीशी** १०
  डॉ. उज्वला केदार काळे यांची मुलाखत
  *मुलाखतकार : शिल्पा जाधव, महाराष्ट्र महिला परिषद*

- **७४ व्या घटनादुरूस्तीचे प्रगतीपुस्तक** १२
  '..... लोकभिमुख राजकारणी बना.....'
  *श्री. राजेंद्र भिसे, युवा मुंबई*

- **शहरनामा** १४
  औरंगाबाद : वाढ की विकास ?
  *डॉ. स्मिता अवचार, सहयोगी प्राध्यापक, डॉ. बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद*

- **खुले पान** १६
  दुखणे काय नि उपाय काय !
  *भारती शर्मा, महाराष्ट्र महिला परिषद*

- **नागरी कारभाराचा अजेंडा - शासन निर्णय व योजनांची माहिती** १९
  *आधार केंद्र* - बृहनमुंबई महानगरपालिका आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांचा संयुक्त विद्यमाने मुंबईत राबविण्यात येणारा एक नाविन्यपूर्ण उपक्रम
  डॉ. *स्नेहा पळणीटकर, संचालिका, अ.भा.स्था.स्व.संस्था, मुंबई*

# 'महानगरपालिका एक अवकाश'
# अर्थ संकल्प व नगरसेवकांची भूमिका

अर्थसंकल्प (बजेट) म्हणजे पुढील आर्थिक वर्षातील जमा व खर्चाचे नियोजन करणे व त्यासाठी महानगरपालिका व नगरपालिका कायद्यांमध्यें दिलेल्या तरतूदींचे पालन करून अशा आर्थिक नियोजनाचा आराखडा तयार करणे. दुसऱ्या शब्दांत मांडायचे झाले तर बजेट म्हणजे अंदाजित / अपेक्षित जमा व खर्च यांचा एका निश्चित कालावधीसाठी तयार केलेला ताळेबंद होय.

राज्य शासन तसेच प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती) अनेक आर्थिक तसेच विविध उपक्रमांची योजना करत असतात. तसेच काही धोरणांचा पाठपुरावाही करीत असतात. नगरपालिकांचे दैनंदिन कामकाजासाठी तसेच अशा उपक्रमांसाठी निधीची व त्या अनुषंगाने आर्थिक नियोजनाची गरज असते.

त्यामुळे अर्थसंकल्प हा निधी मिळवण्याचे वैधानिक माध्यम आहे.

### अर्थसंकल्पाची रचना व तिचे प्रशासकीय महत्व

प्रतिवर्षी अर्थसंकल्प तयार करण्यासाठी लेखा शाखेकडून ३१ जुलै पर्यंत मागील वर्षाचे जमा खर्च लेखे तयार केले जातात व पालिकेच्या मान्यतेने ते कायम केले जातात. त्यानंतर नवीन वर्षाच्या अर्थसंकल्पाचे काम हाती घेतले जाते. सर्व विभागाकडून चालू आर्थिक वर्षातील जमा-खर्च व नवीन वर्षातील प्रस्तावित जमा खर्चाचे आकडे मागविले जातात. ३० नोव्हेंबर पर्यंतच्या ८ महिन्याच्या काळात प्राप्त महसूली व भांडवली जमा आणि महसूली व भांडवली खर्च याचे परिशिष्ट (यादी) तयार केली जाते. त्यानंतर मंजूर अर्थसंकल्पानुसार उर्वरीत ४ महिन्यासाठी अंदाजित जमा खर्चाचे परिशिष्ट पुरवणी मागण्यांसह तयार केले जाते. या सर्व माहितीचे व मागील ३ वर्षातील महसूली व भांडवली जमा खर्च रकमेच्या तपशीलासह नवीन वर्षासाठी प्रस्तावित कामांच्या खर्चाच्या तरतूदींचा तपशील तयार केला जातो. या कामासाठी निधीची कमतरता भासणार असल्यास प्रचलित कर / दरांत वाढ सुचविली जाते. निधीची उपलब्धता दर्शविण्यासाठी पर्यायी उत्पन्नाचे प्रकल्पही प्रस्तावित केले जातात.

संविधानाने निर्देशित केलेल्या तसेच मंजूर केलेल्या सेवा सुविधांवर खर्च करण्याकरिता पुरेशी आर्थिक साधने उपलब्ध करणे हे अर्थसंकल्पाचे वैशिष्ट असते.

### अर्थसंकल्पाबाबत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कायद्यांतील मुख्य तरतूदी

| अ.क्र. | कायद्याचे नाव | संबंधित कलम |
|---|---|---|
| १. | मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ | १२५ ते १३४ |
| २. | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ | ८७, ९५ ते ९८, १०० ते १०४ |
| ३. | नागपूर महानगरपालिका अधिनियम १९४८ | ८६ के ८९ |
| ४. | महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ | १०१ |

वरील तरतूदींनुसार अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये व अंतर्भूत बाबी पुढील प्रमाणे आहेत. प्रत्येक वर्षीच्या अदांजपत्रकामध्ये

१. अर्थसंकल्प ज्या वर्षात सादर केला जातो त्या वित्तीय वर्षातील म्हणजेच १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर पर्यंतचे प्राप्त महसुली व भांडवली उत्पन्न दर्शविले असते.

२. १ डिसेंबर ते ३१ मार्च पर्यंतचे संभाव्य महसुली व भांडवली उत्पन्न

३. १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर पर्यंत प्रत्यक्ष कालावधीसाठी संभाव्य महसुली व भांडवली खर्च

४. १ डिसेंबर ते ३१ मार्च अखेरच्या कालावधीसाठी संभाव्य महसुली व भांडवली खर्च

५. मागील ३ वर्षातील प्रत्यक्ष महसुली व भांडवली उत्पन्न व खर्च (शीर्षक निहाय) तपशील

६. प्रस्तावित खर्च भागविण्यासाठी उत्पन्न वाढीसाठी प्रस्तावित कर वा दर वाढ तसेच इतर उत्पन्न वाढीच्या योजनांचा प्रस्ताव

या वरील ६ बाबींचा तपशील अंदाजपत्रकात असतो. त्याच बरोबर पालिकांना तुटीचे अंदाजपत्रक करता येत नाही, म्हणजेच त्यांना शिलकीचे अंदाजपत्रक करण्याचे बंधन असते.

नगरपरिषदांनी कर्ज घेतले असल्यास अशा अर्थसंकल्पास जिल्हाधिकाऱ्याची मंजुरी घ्यावी लागते.

**अर्थसंकल्प सादरीकरणातील विषयांच्या क्रमवारीचे सर्वसाधारण स्वरूप पुढील प्रमाणे रहाते**

- आयुक्त / मुख्याधिकारी यांचे निवेदन
- चालू आर्थिक वर्षातील जमा-खर्च सुधारीत अंदाजपत्रक
- मागील आर्थिक वर्षात अर्थसहाय्य देऊन पुरविण्यात आलेल्या सेवा व त्यावरील अर्थसहाय्य याचा तपशील
- जमा बाजू - भाग १ - महसूली जमा
  भाग २ - भांडवली जमा
  भाग ३ - असाधारण जमा

अंदाजपत्रक ब - परिवहन

अंदाजपत्रक क - पाणीपुरवठा

खर्च - भाग १ - महसूली खर्च
भाग २ - भांडवली खर्च
भाग ३ - असाधारण खर्च

नवीन वर्षातील जमा व खर्च रकमांचा तपशील सादर करणे. त्यासोबत मागील ३ वर्षातील याच शिर्षकांवरील प्रत्यक्ष जमा व प्रत्यक्ष खर्च याचे विवरणपत्र सादर करणे.

नवीन वर्षातील सुचविण्यात येणारी कर / दर वाढ यांचा तपशील सादर करणे.

महानगरपालिकांमध्ये आयुक्त व नगरपरिषदांमध्ये मुख्याधिकारी अर्थसंकल्प तयार करतात व त्यावर प्रथम स्थायी समितीमध्ये सविस्तर चर्चा होते आवश्यक असल्यास त्यामध्ये स्थायी समिती फेरफार सुचविते व त्यानंतर विहित मुदतीपूर्वी तो सभागृहासमोर सादर केला जातो. तिथे त्यावर साधकबाधक चर्चा होऊन त्याला मुदतीत मान्यता किंवा दुरूस्तीसह मान्यता दिली जाते.

अर्थसंकल्पाच्या संदर्भात लोकप्रतिनिधी या नात्याने नगरसेवकाचे अधिकार काय आहेत हे समजून घेणे गरजेचे आहे. सर्व महानगरपालिकांमध्ये प्रभाग समित्या आहेत. प्रभाग समिती ही त्या त्या विभागातील काही निवडणुक प्रभाग (इलेक्टोरल वॉर्ड) यांची मिळून बनलेली असते. म्हणजेच या समितीमध्ये सगळे नगरसेवक सदस्य असतात. तसेच या समितीमध्ये दोन वॉर्ड अधिकारी आणि त्या प्रभागातील तीन अशासकीय संस्था संघटनांचे प्रतिनिधि असतात. या प्रभाग समितीमध्ये नगरसेवकाला प्रभागातील विकास योजनांचा विचार करून त्या अर्थसंकल्पात समाविष्ट करण्याचे प्रस्ताव सुचवता येतात. हे प्रस्ताव आयुक्तांकडे पाठविले जातात. प्रशासकीय स्तरावर झालेला अंदाजपत्रकाचा मसुदा व प्रभाग समित्यांकडून आलेल्या सूचनांचा योग्य विचार करून अंतरिम प्रस्तावित अर्थसंकल्प आयुक्त करतात. सुचवलेल्या प्रस्तावांचे ठरावात रूपांतर झाल्यास व ते मंजूर झाल्यास त्याचा समावेश अर्थसंकल्पामध्ये होतो. अर्थसंकल्पाच्या विषयात स्थायी समितीला महत्वाचे अधिकार आहेत. स्थायी समितीमध्ये नगरसेवकांनी निवडून दिलेले सदस्य, ज्यामध्ये सत्ताधारी पक्षाबरोबरच विरोधी व इतर पक्षांचेही सदस्य असतात. स्थायी समिती आयुक्तांनी पाठविलेल्या अर्थसंकल्पात आवश्यक ते बदल तर करू शकतेच पण त्यात न सुचवलेले नवीन काम आर्थिक प्रावधानासह मंजूर करू शकते.

महिला लोकप्रतिनिधींनी स्थायी समितीमध्ये प्रवेश मिळवण्याची नक्कीच आकांक्षा बाळगली पाहिजे. महिला व बाल कल्याण समितीमध्ये नगरसेविकांचा सहज प्रवेश होतो. मात्र या समितीला वैधानिक अधिकार कोणतेच नाही. त्यामुळे स्थायी समिती जिथे नगरसेवकाला आर्थिक व नियोजनाचे अधिकार आहेत तसेच पहिल्यापासून पुरूष लोकप्रतिनिधींचेच प्राबल्य राहिले आहे, अशाठिकाणी नगरसेवकांनी महिला प्रवेश मिळविण्याची तयारी नक्कीच केली पाहिजे. आपल्या मतदारसंघाच्या आवश्यकतांना अर्थसंकल्पात स्थान मिळवून देण्याचे आव्हान शहराच्या कारभारणीने घ्यायला पुढे आले पाहिजे.

**श्री. प्रकाश ओरपे**
निवृत्त उपसंचालक
नगरपरिषद, प्रशासन संचनालय, महाराष्ट्र शासन

❐❐❐

*सर्वात मोठे आयुध तुम्हाला विभागामध्ये काम करताना वापरावे लागते ते विविध कामांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करणे, त्याकरिता शिफारस करणे, जास्तीत जास्त निधी स्वतःच्या विभागात आणणे. या सर्व विषयांचा, विविध कलमांचा अभ्यास केल्यास महानगरपालिका सदस्यास काम करताना अडचणी येत नाहीत आणि फसवणूक ही होत नाही.*

**श्रीमती शैलजा गिरकर,**
उपमहापौर, मुंबई महानगरपालिका, आधार : 'मी नगरसेविका' पुस्तिका

# 'विशेष लेख'

# शहरी गरीबी - कारभारणींसाठी संधी व आव्हाने

भारतामधल्या गरीबीचे स्वरूप अधिकाधिक शहरी होत आहे. याचा अर्थ असा की लहान, मोठ्या सर्व शहरांमध्ये गरीबीचे प्रमाण वाढताना दिसत आहे. शेती व्यवस्थेतील बदलांमुळे गावांकडून शहरांकडे लोकांचा ओघ चालूच राहणार आहे हे निश्चित. यामुळे शहर व्यवस्थापकांना व पर्यायाने लोकप्रतिनिधींना शहरी गरीबीला सामोरे जाण्याचे मोठे आव्हान उभे रहात आहे. परंतु याच आव्हानांत शहरांना सर्वार्थाने समावेशक बनवण्याची संधी देखील आहे. यामुळेच गरीबीचे निर्मूलन हा कारभारणींसाठी एक दीर्घ पल्ल्याचा अजेंडा आहे. या आव्हानाच्या विविध पैलूंची ओळख यासाठी महत्वाची आहे.

### शहरी गरीबी

शहरी गरीबी व ग्रामीण गरीबीमध्ये काही महत्वाचे फरक आहेत, त्याचबरोबर काही दुवेही आहेत. गावात गरीब कोण व शहरात गरीब कोण याचा अंदाज घेतला तर दलित व मागासवर्गीयांचे प्रमाण दोन्हींकडे अधिक दिसते. ग्रामीण गरीबांमध्ये आदिवासी समुहांचे बाहुल्य मात्र शहरी गरीबीत नाही. आणखी एक महत्वाचा दुवा म्हणजे स्थलांतरामधील शहरातील सर्वाधिक दुर्बल घटक जर कोणता असेल तर तो म्हणजे कामासाठी स्थलांतर करणाऱ्या मजूरांचा. याचबरोबर शहरी व ग्रामीण गरीबीमध्ये लक्षणीय फरक देखील आहेत.

- नैसर्गिक साधनांचा आधार : पाणी, जंगल, जमीन यातून मिळणारा उपजीवीकेचा आधार हा ग्रामीण गरीबांसाठी खूप मोलाचा असतो. याउलट शहरांमध्ये हा आधार अभावानेच मिळतो. यामुळे शहरी गरीबांना सर्व गोष्टींसाठी बाजारपेठेवर अवलंबून रहावे लागते.

- बाजारपेठेच्या अनिश्चिततेचा प्रभाव : गावांतून लोक शहराकडे येतात ते आर्थिक संधीसाठी. शहरे निश्चितपणे उपजीवीकेच्या अधिक संधी देतात. मात्र या संधी बाजारपेठेच्या स्वभावानुसार अनिश्चित असतात. जे बऱ्यापैकी स्थिर स्थावर दिसतात ते महिन्याभरांत कंगाल होऊ शकतात. बाजारपेठेच्या बदलत्या कामात सातत्य टिकवणे हे गरीबांपुढे आव्हान असते.

- शासकीय यंत्रणेचा प्रभाव : शहरांमध्ये काम मिळते पण घर नाही. यामुळे अनेक गरीबांना झोपडवस्त्या वा इतर अनधिकृत वस्त्यांमध्ये रहावे लागते. गावांमध्ये असणाऱ्या पिढ्यांपिढ्यांच्या ओळखी व नाती सोडून शहरांमध्ये अनाम व्हावे लागते. गावातले वास्तव्याचे पुरावे लागू पडत नाहीत. त्यामुळे प्रत्येक सेवा ही खाजगी पुरवठादारांकडून व वाढीव दराने घ्यावी लागते. पुराव्यांच्या अभावाने, अनधिकृत वास्तव्य स्थानामुळे शासकीय यंत्रणांचा आधार तर नसतोच, अनेकदा त्यांच्या विरूध्द कारवायांचे (जसे फेरीवाले, झोपडवस्त्यां विरूध्दच्या मोहिमा) बळी व्हावे लागते. केवळ उपजीवीकेमुळे बेकायदेशीर ठरवले जाते व त्याचे परिणाम भोगणे हा शहरी गरीबीचा स्थायीभाव आहे.

### गरीबी निर्मूलन

थोडक्यात काय तर शहरांतील गरीबांचे जगणे ही तारेवरची कसरत आहे. सोबतीला स्वतःच्या श्रमांची, कौशल्यांची व संबंधितांची गाठोडी बाळगून अनिश्चित बाजारपेठेत व शासकीय सेवांच्या आधारापासून वंचित, कायद्याच्या विरूध्द स्वतःचे व कुटुंबासाठी विकासाच्या संधी शोधत राहणे सोपे नाही. या प्रयत्नांची जाण ठेवणे, त्यांना बळकटी देणे व या मार्गातील अडथळयांना, बाधांना कमी करणे ही गरीबी निर्मूलनांच्या प्रयत्नांची दिशा असायला हवी.

शहरी गरीबीचे स्वरूप एकसारखे नाही. यात घराचा व कुटुंबाचाही मर्यादित आधार असलेले बेघर आहेत, पोटावर हात ठेवून जगणारे मजूर आहेत, आर्थिक स्थिरता असलेले परंतु घरे न परवडणारे व म्हणून झोपडवस्तीतच राहणारे आहेत. तसेच या गरीबीला निवारा, (असुरक्षित वास्तव्य, पाणी, संडास, लाईट, रस्ते याचा अभाव) सामाजिक सेवा (अन्न, शिक्षण, आरोग्य याचा अभाव) व उपजीविकेच्या सुरक्षिततेचे पैलू आहेत. यामुळे गरीबी निर्मूलनाचे प्रयत्न सर्वंकष व बहुआयामी असण्याची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर सध्याच्या गरीबी निर्मूलनाच्या योजना कशा दिसतात हे बघायला हवे.

## सध्याच्या शहरी गरीबी निर्मूलनाच्या योजना

१) **शहरांतील जमीन अल्प उत्पन्न गटांसाठी राखीव** : यामध्ये सर्व गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये अल्प उत्पन्न गटासाठी तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी विकसीत जमिनीपैकी किमान २० - २५ % जमीन राखून ठेवणे राज्य शासनाला बंधनकारक केले आहे.

२) **शहरी गरीबांसाठी बजेटचा हिस्सा राखीव** : राज्य शासनाने सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना (महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचयत) यांना अर्थसंकल्पामध्ये नागरी गरीबांसाठी एकूण अर्थसंकल्पाच्या २५% रक्कम राखून ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. याला 'पी' बजेट असेही म्हणतात.

३) **बेघरांसाठी रात्र निवारे** : राज्य शासनाने दिनांक १४ जुलै २००१ च्या परिपत्रकाद्वारे बेघरांसाठी 'रात्र निवारे' प्रती एक लाख लोकसंख्येमागे ऐक बांधण्याचा निर्णय प्रसिध्द केला आहे.

४) **सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना** :केंद्र शासनाने वर्ष १९९७ मध्ये शहरी गरिबी निर्मुलनाच्या हेतूने ही योजना सुरु केली आहे. शहरातील अर्ध बेरोजगार, बेरोजगार तसेच गरीब यांच्यासाठी स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करुन त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठीची ही योजना आहे.

५) गरीबांसाठी घरकुलांच्या योजना यामध्ये वाल्मीकी आंबेडकर आवास योजना, एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी सुधार कार्यक्रम, राजीव आवास योजना, शहरी गरीबांना घरकुल कर्जासाठी व्याज अनुदान योजना.

या सर्व योजनांचा आढावा घेतल्यास हे लक्षात येते की या योजनांची कक्षा मर्यादित आहे. शहरी गरीबीचे वाढते प्रमाण व बहुआयामित्वाच्या मानाने या योजना एकागी आहेत. त्यामुळे त्यांचा उपयोग व प्रभाव देखील मर्यादित आहे. या मर्यादांची जाणीव ठेवून केंद्र सरकार सध्या राष्ट्रीय शहरी जीवीका मिशनची आखणी करत आहे. परंतु या सद्यस्थितीत देखील लोकप्रतिनिधींनी व खास करून कारभारणींनी स्वारस्य घेतल्यास या योजना प्रभावीपणे लोकांपर्यंत नेता येतील.

पुढे काही संधी / शक्यता दिल्या आहेत.

१. गरिबी रेखेमध्ये लोकांचा समावेश करून घेणे.

नियोजन आयोगाच्या २००४-०५ च्या अहवालानुसार शहरी भागातील दरडोई प्रति व्यक्तिच्या अनुक्रमे रु ५७८ खर्चावर दारिद्र्यरेषा निश्चित करण्यात आली होती. यासाठी महापालिकेतर्फे गणना केली जाते. ही माहिती लोकांपर्यंत पोचवणे, प्रारूप यादी मध्ये राहून गेलेली नावे समाविष्ट करणे हे मोठे काम आहे. सरकारी योजनांचे लाभ या यादीत नाव नोंदवले असल्यास मिळतात. त्यामुळे जेवढी यादी योग्य तेवढी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीची शक्यता जास्त.

२. गरीब महिलांना स्वयं सहाय्यता गटांच्या माध्यमातून संघटित करणे.

स्वयं सहायता गट बचत, अंतर्गत कर्ज, आर्थिक कार्यक्रम या साखळीतून बांधले जातात. सर्व योजनांमध्ये बचत गट निगडीत योजना सर्वाधिक यशस्वी होताना दिसतात. यातून कुटुंबांना आर्थिक आधार तर मिळतोच पण गरीब महिलांच्या संघटित कृतींनाही चालना मिळते. त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

३. योजना वापरण्यातील अडथळे दूर करण्यास मदत करणे.

योजनांचा लाभ घेण्यामध्ये अनेक अडथळे असतात. उदा. योग्य कागदपत्रांचा अभाव, वित्तीय संस्थांमध्ये ओळख नसणे, विविध कार्यालयांत वारंवार मारावे लागणारे खेटे, योजनेची व्यवस्थित माहिती नसणे इ. लोकप्रतिनिधींनी रस घेतल्यास यातील अनेक अडथळे दूर करता येतील.

४. गरीब वस्त्यांना मुलभूत सुविधांचा पुरवठा करणे.

पाणी, वीज, गटारे, संडास, पायवाट या सुविधांच्या पुरवठ्यामुळे गरिबांच्या अस्थिर आयुष्याला स्थिरता मिळते. सुसह्य व किमान आरोग्यदायी जीवनासाठी या सुविधा आवश्यक आहेत. खासदार / आमदार फंडातून, केंद्र / राज्य शासनाच्या योजनांतून व आता 'पी'.बजेटमधून (गरीबांसाठीचे बजेट) अशा सुविधा निर्माण करता येतात.

५. विविध योजनांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न करणे

केंद्र सरकार, राज्य सरकार यांच्या विविध कल्याणकारी योजना आहेत. या सर्व योजना अनेकदा योग्य त्या लोकांपर्यंत पोचतच नाहीत. म्हणूनच या योजना अभ्यासून, निवडून व जरूर पडल्यास त्यांचे एकत्रीकरण करून वा सुसूत्रीकरण करणे गरजेचे ठरते. यातही लोकप्रतिनिधींची भूमिका आहे.

६. शहरातील विविध गटांच्या एकत्रीकरणातून उदरनिर्वाहाचे नवीन मॉडेल्स उभी करणे

छोट्या उद्योगांना संघटित करून बाजारपेठेशी जोडून त्यांचे ब्रांडिंग करूनच गरिबीच्या दुष्टचक्राला भेदणे शक्य आहे. यासाठी असंख्य गोष्टींची जुळवाजुळव करावी लागते. उदा. कौशल्य, कागदपत्रांचे व्यवस्थापन, जागा इ. या सर्वात लोकप्रतिनिधींचे नेतृत्व खूप महत्वाचे आहे.

७. मुलभूत सुविधांची शाश्वती व दर्जा सुधारण्यासाठी नवीन मॉडेल्स उभे करणे.

अनेक लोकप्रतिनिधी फंडातून मुलभूत सुविधा पुरवतात. परंतु या पुरवठ्यात दर्जा, नेमकी गरज, लोक सहभाग व शाश्वतता यांचा विचार फारसा नसतो. यामुळे परत परत या गोष्टींवर खर्च करावा लागतो. म्हणूनच या क्षेत्रात तंत्रज्ञान, लोक सहभाग वापरून नवे प्रयोग करण्याची गरज आहे.

८. शहरातील उद्योगांना, धनिकांना गरिबी निर्मूलनासाठी प्रवृत्त करणे.

गरिबी हा एक सामाजिक कलंक आहे, ती दूर करणे हे प्रत्येक समाजघटकाचे कर्तव्य आहे. सध्या, गरीबी निर्मूलनामध्ये कार्यक्रम केवळ केंद्रसरकारच्या योजनांपुरते सीमीत आहेत. या मर्यादित बजेटमध्ये वाढ होण्याची नितांत गरज आहे. यासाठी स्थानिक उद्योगांना, धनिकांना प्रवृत्त करून निधी तयार करता येऊ शकेल. यामुळे या कामाला अधिक गती मिळेल.

गरीब हा शहराचा मोठा घटक असला तरीही गरीबी निर्मूलन हा नागरी कारभाराचा मोठा पैलू मानला जात नाही. स्थानिक कारभार अधिक समावेशक करणे व त्याद्वारे राजकारणाचा पोतही बदलणे ही शहरी कारभारणींसाठी मोठी संधी आहे. त्या निश्चितच ती उचलतील ही खात्री आहे.

**डॉ. (प्रा.) अमिता भिडे,**
टाटा समाज विज्ञान संस्था, मुंबई

❒❒❒

## ‘अशीच खुर्ची !’

गावातील महिलांनी आपली ग्रामपंचायत आतून बघावी. ग्रामपंचायतीचे कामकाज समजून घ्यावे, यासाठी ग्रामपंचायत दर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हातात वही व पेन घेऊन २०-२५ च्या संख्येने महिला ग्रामपंचायतीत गेल्या. कागदपत्र नाही. पण ग्रामपंचायती मधील खुर्च्या त्यांनी मोजल्या. सरपंचाची, उपसरपंचाची ग्रामसेवकाचीही ! पण ही खुर्ची कुणाची ? ती अशीच खुर्ची आहे असे ग्रामसेवकाने सांगितले.

मग 'अशीच खुर्ची' कोणत्या कोणत्या गावात आहे याचा शोध सुरू झाला. ज्या गावात महिला सरपंच आहेत त्याच गावात अशीच खुर्ची दिसून आल्या ! त्यावेळी कामकाजात कौटुंबिक हस्तक्षेपाचा मुद्दा समोर आला.

टीप्पणी : लोकप्रतिनिधीच्या कामात कुटुंबाचा हस्तक्षेप हा मुद्दा ग्रामीण भागातच नव्हे तर शहरातही दिसून येतो. कौटुंबिक हस्तक्षेप हा ‘सहकार्यामध्ये’, ‘प्रोत्साहनामध्ये’ बदलण्याचेही आव्हानही शहरी कारभारणीसमोर आहेच !

आधार : महिला राजसत्ता आंदोलन विशेषांक, राजसत्तेतल्या कारभारणी

# 'संवाद कारभारणीशी'
# डॉ. उज्वला केदार काळे यांची मुलाखत

डॉ. सौ. उज्वला केदार काळे या पालघर येथे जवळ पास वीस वर्ष राजकारणात सक्रीय आहेत. १९९४ साली ग्रामपंचायतीत तर १९९९, २००४, २००९ साली नगर परिषदेत त्या निवडून आल्या. एकदा अपक्ष, दोनदा भारतीय जनता पक्षाकडून तर या वेळेला त्यांनी कांग्रेसपक्षाकडून निवडणूक लढविली. राजकारणात त्यातही निवडणुकीच्या राजकारणात बहुसंख्य महिला येतात ते कुटुंबातील राजकारणात असणाऱ्या एखाद्या पुरूष नातेवाईकाच्या मदतीने हा समज त्यांनी खोटा ठरविला आहे.

लहानपणापासून अभ्यासात हुशार असलेल्या उज्वलाताई व्यवसायाने डॉक्टर आहेत. कॉलेजमध्ये अभ्यासाबरोबरच त्या अन्य सामाजिक कामात सक्रीय असायच्या. गावात जाऊन आरोग्य, स्वच्छतेबद्दल सर्वेक्षण करणे यात त्यांना रस असायचा. राजकारणात तुम्ही कशा आल्यात हे विचारल्यावर त्यांनी एक घटना सांगितली. लग्न झाल्यावर त्या पालघर येथे रहायला आल्या. त्यांच्या मुलाला तो लहान असताना मलेरिया झाला होता. गावांमध्ये स्वच्छता नसणं, त्यांच्यासाठीच्या सुविधा नसणं याची जाणीव झाली. ग्रामपंचायतीच्या निवडणुका १०-११ वर्ष झालेल्या नव्हत्या. स्वच्छतेसाठी काही तरी करायला हवे म्हणून मैत्रिणी-सहकाऱ्यांशी विचार विनिमय करून त्यांच्या सहकार्याने त्या निवडणुकीला पहिल्यांदा उभ्या राहिल्या. त्यानंतर मात्र त्यांनी मागे वळून बघितले नाही.

निवडणूक म्हटली की आर्थिक ताकद लागते, विरोधकांना तोंड द्यावे लागते या बाबत डॉ. उज्वला काळे अनुभव सांगत होत्या. लोकप्रतिनिधीची जबाबदारी पार पाडत असतांना त्या स्वतःचा डॉक्टरी व्यवसाय ही सांभाळतात. पालघर मध्ये काम करतांना विरोधकांचा त्रास होताच मात्र महिलांचे सहकार्य मोठ्या प्रमाणावर मिळाले. कुटुंबात पतीचा पूर्ण पाठिंबा असल्याने मी अशा गोष्टींना तोंड देऊ शकले. नगरपरिषदेत काम करतांना अपक्ष प्रतिनिधींची कामें व्हायला वेळ लागतो. मात्र पक्ष असेल तर तुलनेने सोपे जाते. मंत्रालयात पक्षाच्या सहकार्याने पाठपुरावा करता येतो.

त्यांच्याशी बोलताना त्यांचे एक वैशिष्ट्य प्रकर्षाने जाणवले. पालघर नगरपरिषदेत एकूण नऊ महिला प्रतिनिधी आहेत.

डॉ. उज्वला काळे या पुढाकार घेऊन या सर्व महिलांना एकत्र घेऊन नगरसेविकांची सभागृहातील सक्षमता वाढेल यासाठी प्रयत्नशील असतात. या नगरसेविका वेग-वेगळया पक्षाकडून नगरपरिषदेत आल्या आहेत मात्र नगरपरिषदेत त्या एकमेकांच्या अडचणींबाबत चर्चा करतात, प्रसंगी एकत्रितपणे आवाज ही उठवतात

सभागृहात पूर्वीच्या मानाने महिला आता बोलू लागल्या आहेत असा त्यांचा अनुभव आहे. रस्ते, गटार, स्वच्छता या कामांबरोबरच त्यांचा भर असतो तो आरोग्य शिबिराबाबत स्त्री लिंग गर्भचाचणी च्या विरोधात डॉ. उज्वला काळे सक्रीयतेने काम करतात. स्त्रियांमध्ये या बाबत जागृती करतात. आपल्या विभागात त्या "लेक लाडकी अभियान" राबवितात.

राजकारणात महिलांनी टिकून रहावे यासाठी काय करणे गरजेचे आहे, याबाबत त्यांनी पहिला सल्ला दिला की पुरूष सहकाऱ्यावर पूर्णपणे अवलंबून राहू नये. स्वतः जनसंपर्क वाढवायला हवा. तोच शेवटी उपयोगी पडतो. आणि या करिता महत्वाचे आहे ते म्हणजे महिलांनी कामाचे नियोजन करणे. त्या स्वतः आठवड्यातून दोन दिवस बोरिवली येथे आपल्या दवाखान्यात काम करतात तर तीन दिवस नगरपरिषदेच्या कामासाठी ठेवतात.

निवडून आलेल्या महिलांनी स्वतंत्रपणे काम करायचे असल्यास, स्वतःच्या डोक्याने काम करायचे असल्यास, त्यांची प्रशिक्षण शिबिरें होणे अत्यंत गरजेचे आहे असे त्यांना वाटते. या क्रमाने सक्षम झालेल्या महिला विधानसभा वा लोकसभेत गेल्यावर ते अर्थपूर्ण होईल असे त्यांना वाटते. ग्रामीण भागात निवडून येणाऱ्या महिलांचे काही प्रमाणात का होईना संघटन झाले आहे. गावो-गावच्या महिला एकत्र येतात, आपले प्रश्न मांडतात, मार्ग काढतात. अशाच प्रकारचे शहरी भागातील महिला प्रतिनिधींचे असोसिएशन व्हावे असे मत त्यांनी मांडले. नगरपरिषदेत काम करताना अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागते. आम्हाला असा प्लॅटफॉर्म मिळाल्यास आम्ही किमान आपले प्रश्न तरी तिथे मोकळयापणाने मांडू शकू नाहीतर स्वबळावर जितके करता येईल तेवढेच काम होते.

डॉ. उज्वला काळेंना जेव्हा विचारले की तुम्ही एका पक्षातर्फे निवडून आलेल्या असतांनाही सर्व नगरसेविकांशी विविध प्रश्नांवर चर्चा करता, अगदी नियोजन असो किंवा महासभेच्या आधी नगराध्यक्षांना भेटायचे असो सगळयांना सोबत घेता, या मागची आपली प्रेरणा काय आहे ? त्या म्हणाल्या की मला वाटते महिलांनी स्वतःच्या डोक्याने काम करायला हवे. जे शिक्षण घेतले, त्याचा उपयोग करायला हवा. स्वतःचे आर्थिक स्त्रोत तयार करायला शिकायला हवे तर पुरूष राजकारण्यांवर पूर्णपणे अवलंबून राहण्याची वेळ त्यांच्यावर येणार नाही. ही सक्षमता आली तरच महिला आरक्षणाला अर्थप्राप्त होईल. म्हणून प्रत्येक महिला नगरसेविकेला त्यांच्या वॉर्डातील प्रश्नांचा अभ्यास करून प्रश्न मांडण्यासाठी त्या वारंवार प्रोत्साहन देतात.

महिलांना राजकारणात ५० टक्के आरक्षण द्यायला त्यांचा विशेष पाठिंबा नाही. त्यांचे म्हणणे आहे की ३३ टक्के महिला सक्षम व्हायला वेळ द्यायला हवा. नाहीतर महिलांच्या वतीने कारभार करणारे पुरूषच असतील अशी ठाम भीती त्या व्यक्त करतात.

**मुलाखतकार**
शिल्पा जाधव

**शब्दांकन**
भारती शर्मा
महाराष्ट्र महिला परिषद

❐❐❐

## हिम्मत असेल तर

तू एक स्त्री,
म्हणून पक्क लक्षात ठेव.

जेव्हा घरची चौकट ओलांडशील,
लोक तुझ्याकडं सरळ नजरेनं पाहणार नाहीत.

तू जेव्हा गल्लीबोळातून
जायला लागशील,
तेव्हा ते तुझा कदाचित पाठलाग करतील.
शिट्ट्याही मारतील.

गाव ओलांडून मोठ्या रस्त्यावर आलीस तर,
एखाद्यावेळस, तुला कुलटा म्हणून शिव्याही देतील.

हे सोसण्याचं बळ जर नसेल तुझ्यात,
तर आत्ताच मागे फिरलेलं बरं !

पण जर हिंमत असेल...
तर जशी तू निघाली आहेस,
तशीच पुढे जात राहशील.

मुळ कविता : **तस्लीमा नसरीन**
रूपांतर : **मृणालीनी गडकरी**

# '७४ व्या घटनादुरूस्तीचे प्रगती पुस्तक'

## फक्त नगरसेविकेच्या पदावर समाधानी राहू नका, लोकाभिमुख राजकारणी बना . .

भारतीय समाजव्यवस्थेत महिलांना अजूनही दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते त्याचेच प्रतिबींब आपल्या राजकीय व्यवस्थेतील स्त्रियांच्या सहभागा संदर्भात आहे. घटनाकार डॉ. आंबेडकरांच्या आग्रहामुळे महिलांना मतदानाचा हक्क देण्यात आला. त्यानंतर खऱ्या अर्थाने सर्वसामान्य महिलांना राजकारणाची दालने ७३व्या व ७४ व्या घटनादुरूस्तीमुळे उघडली गेली.

ज्या कायद्याच्या चौकटीमुळे सर्वसामान्य वर्गातील व कुटुंबातील स्त्रियांना महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये कारभारणी बनण्याची संधी मिळाली त्या ७४ व्या घटनादुरूस्तीला आपण समजून घेणे गरजेचे आहे. ७४ व्या घटनादुरूस्तीचा मुख्य उद्देश शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना ''स्थानिक स्वराज्य सरकार'' म्हणून मान्यता देवून राज्यसरकाराच्या नियंत्रणातून मुक्त करणे, सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आणि जनतेचा सहभाग वाढवून लोकाभिमुख प्रशासन व्यवस्था विकसीत करणे होय. समाजातील वंचित व दुर्बल घटकांचा, दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय व महिलांचा राजकारणात सहभाग वाढवणे हा होता त्यामुळे महिलांना सत्तेत सुरूवातील ३३ टक्के व आता ५० टक्के वाटा मिळाला आहे. आरक्षण फक्त नगरसेवक पदाकरीता न राहता नगराध्यक्ष व महापौर पदाकरीता लागू करण्यात आले आहे. सुरूवातील पुरूषांचा हात धरून सर्वसामान्य कुटुंबातील स्त्रिया राजकारणात आल्या. आज पुरूष व पुरूषी मानसिकतेचा सामना करीत त्या स्वतंत्रपणे राजकारणात स्थिरावतांना दिसत आहे. स्थानिक राजकारणात नगरसेविकांना आपले स्थान मजबूत करायचे असल्यास सर्वप्रथम आपला हक्काचा मतदार संघ बांधणे, लोकाभिमुख प्रक्रियेला लोकसंग्रह निर्माण करणे व विकासाच्या प्रश्नावर प्रगल्भता व कार्यशिलता निर्माण करणे गरजेचे आहे. आपल्या पदाचा वापर करून आपल्या भागात सार्वजनिक सेवा - सुविधां करीता निधी व विविध विकास प्रकल्प आखणे व त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. परंतु हे इतके सोपे नाही. सर्व लोकप्रतिनिधींमध्ये याबाबत स्पर्धा असते. तसेच संसाधने मर्यादित स्वरूपात उपलब्ध असतात. त्यामुळे जो लोकप्रतिनिधी आपल्या विभागाचा सर्वसमावेशक विकास आराखडा बनवून त्याकरीता तत्काळ व लांब पल्ल्याची आखणी जनतेला सोबत घेवून करतो, तोच यात यशस्वी ठरतो. आपल्या मतदार संघावर मजबूत पकड निर्माण केली जाऊ शकते; परंतु याकरीता लोकाभिमुख राजकारण व लोकसंग्रहाची गरज आहे.

सर्वात प्रथम आपण लोकसमूह व आपल्या विभागातील नागरिकांशी नातेसंबंध विकसीत करताना व्यक्तीगत पातळीवर जास्तीत जास्त भर देतो. नागरिक आपल्याकडे व्यक्तीगत कामे घेवून येतात ती आपण करतो किंवा नागरिकांच्या सुख दुखाःत आपण सहभागी होतो. ते होणे गरजेचे आहे. परंतु त्याचबरोबर नागरिकांचा सामुहिक सहभाग व आपल्या मिशन मध्ये भागीदारी वाढविणेही गरजेचे आहे.

७४ व्या घटनादुरुस्तीने यादृष्टीने काही संधी व जागा उपलब्ध करुन दिल्या आहेत. यामध्ये 'प्रभागांची निर्मिती' याचा उल्लेख करता येईल. ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची लोकसंख्या ३ लाखाच्या वर आहे तिथे एक किंवा त्यापेक्षा अधिक निवडणूक प्रभागांची मिळून प्रभाग समिती करावी. आज महाराष्ट्रात महानगरपालिकांमध्ये प्रभाग समित्या झालेल्या आपण पाहतो. आपण ही या प्रभाग समितीचे सदस्य आहात. या प्रभाग समितींची कार्यकक्षाही कायद्याने निश्चित केलेली आहे. नागरिकांचे सोयी-सुविधांचे प्रश्न सोडविणे. प्रभागांशी संबंधित खर्चाच्या अंदाजाबाबतचे, अर्थसंकल्पा संदर्भातील (बजेट विषयात) प्रस्ताव आयुक्तांना पाठविणे, प्रभाग समितीच्या क्षेत्रातील ५ लाखांपर्यंतच्या विकास कामांना मंजूरी देणे, महानगरपालिकांना योग्य वाटल्यास अन्य कामे, विषय प्रभाग समित्यांना देणे, अशा स्वरुपाची मर्यादित कामे व अधिकार प्रभाग समित्यांना दिले आहेत. प्रभाग समित्यांच्या कामकाजाबाबत एक महत्त्वाचे निरिक्षण इथे नोंदवावेसे वाटते, ते म्हणजे या समित्यांमध्ये ७४ व्या घटनादुरुस्तीने महानगरपालिकांकडे सोपवलेले विषय म्हणजे सामाजिक व आर्थिक नियोजन, झोपडपट्ट्यांचा विकास, नागरी भागातील दारिद्र्य निर्मूलन हे विषय प्रभाग समित्यांच्या कार्यकक्षेत दिलेले नाही. खर तर अशा विषयांवर या प्रश्नांबाबत नगरसेवकांची एक ठोस भूमिका असायला हवी. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत असलेल्या या प्रश्नांवर प्रभागसमितीमध्ये चर्चा व भूमिका घेण्याचा आग्रह लोक प्रतिनिधी या नात्याने नक्कीच करता येवू शकतो आपण तो करतही असाल.

दुसरी संधी ही २००५ साली केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण योजना (जे एन एन यु आर एम) अंतर्गत मिळाली आहे. नागरी कारभार विकेंद्रीत करण्याच्या दृष्टीने प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 'क्षेत्र सभेची' निर्मिती करण्याचा कायदा महाराष्ट्र शासनाने ३ जुलै २००९ रोजी संमत

केला आहे. महानगरपालिका व नगरपरिषदांच्या कायद्यांमध्ये याविषयीची तरतूद केली आहे. यानुसार प्रभाग समित्यांच्या खाली क्षेत्र सभा असतील. किमान दोन किंवा जास्तीत जास्त पाच सलग मतदार केंद्रांची (पेलिंग बुथ) मिळून एक क्षेत्र सभा असेल. प्रत्येक मतदार हा क्षेत्रसभेचा सदस्य असेल तर क्षेत्र सभेचा अध्यक्ष हा संबंधित निवडणुक प्रभागाचा निर्वाचीत सदस्य म्हणजे नगरसेवक असणार आहे. हा कायदा संमत झाला असला तरिही त्याचे नियम न झाल्यामुळे कायद्याची अंमलबजावणी स्थानिक ठिकाणी होताना दिसत नाही. मात्र या क्षेत्रसभांचे अधिकार व कार्यकक्षा पाहता नगरसेवक व नागरिक यांच्यामधील नातेसंबंध घट्ट करण्याची संधी यामध्ये दिसते.

त्याकरिता स्थानिक भागाच्या नगर सेविका म्हणून आपल्या विभागात प्रत्येक पोलींग बुथवर नागरिकांच्या समित्या बनवून दर महा त्यांच्या सभा घेवून त्यात आपल्या विभागाचे प्रश्न, आपण केलेले प्रयत्न, त्याला आलेले यश व अडचणी यावर चर्चा घडवून आणली तसेच नागरीक व प्रशासन यांच्या मध्ये आपण एक दुआ म्हणून कार्य केल्यास निश्चितपणे आपले नागरिकांशी असलेले नाते अधिक घट्ट होईल. व्यक्तीगत कामाऐवजी सार्वजनिक कामाला अधिक महत्त्व प्राप्त होईल. प्रशासनावरील पकड मजबूत होईल. प्रशासनाला अधिक उत्तरदायी करता येईल. आपल्या भागातील नागरिकांमध्ये काही विविध क्षेत्रात तज्ञ लोक असतील परन्तु त्यांना राजकारणात रस नाही अशा नागरिकांचा उपयोग विविध प्रश्नावर तांत्रिक बाजू समजून घेण्याकरिता तसेच आपल्या विभागातील विकासाच्या कार्यात त्याचा सहभाग वाढवता येवू शकेल. हे सर्व करण्याआधी आपल्या मनात 'विरोधक' नागरीकांच्या सभांमधून धुडघूस घालतील व आपल्याला काम करू देणार नाही अशी शंका निश्चित येईल. सुरूवातीला ती परिस्थिती उद्‌भवू शकते परंतु तुम्ही प्रामाणिक असाल, प्रामाणिकपणे प्रयत्न करीत असाल तर आपल्या सभेत येणारे लोक आपल्या बाजूने उभे राहतील व हळुहळू त्यांचा विरोध मावळेल कालांतराने ते सभेत सुध्दा येणार नाहीत. ही परिस्थिती हाताळण्याकरीता त्या विभागातील राजकीय दृष्ट्या कुठल्याही पक्षात नसलेल्या तसेच अनुभवी व जेष्ठ व्यक्तीला सभेचे अध्यक्ष स्थान दिल्यास विरोध मावळण्यास मदत होईल.

याच प्रक्रीयेतून आपल्या विभागाचा विकास कामाचा आराखडा बनवताना कुठली आरक्षणे आहेत ती बघावी. त्याचसोबत इतर प्रकल्प कुठले सुरू करता येतील ते पहावे. याची आखणी करावी ते कुठले प्रकल्प व योजना महानगरपालिकेकडे, राज्य सरकारकडे, जिल्हा नियोजन किंवा संबंधित खात्याकडे पाठवायचे आहेत त्याची योग्य आखणी करावी स्थानिक पातळीवर त्याची पाठपुरावा करावा. मंजुरी व अंमलबजावणीच्या प्रक्रीयेत लक्ष घालावे. त्यामुळे आपली प्रतिमा दूरदृष्टी असलेला राजकारणी म्हणून बनण्यास मदत होईल. समाज, माध्यम, आपले सहकारी यांच्यांमध्ये आपल्या बद्दल आदर वाटेल

स्थानिक प्रशासनासोबत विविध स्थानिक विकास प्रकल्प नागरी सुविधा संदर्भात संवाद साधताना आपण प्रतिनिधी असलेल्या सभागृहात आयुधांचा परिणामकारकपणे वापर करा त्याद्वारे सभागृहात चर्चा घडवून प्रशासन अधिक उत्तरदायी होईल त्याला एका प्रमाणिक नगरसेविकेचा आदरयुक्त धाक निर्माण होण्यास मदत होईल वेळपडल्यास आपल्या भागातील जनतेसोबत सार्वजनिक हितासाठी रस्त्यावर उतरून लढाई लढण्याची वेळ आल्यास जनता तुमच्या सोबत असेल. अन तुम्ही एक नगरसेविका म्हणून नव्हे तर स्थानिक राजकारणी एक प्रभावी व्यक्ती म्हणून आपली ओळख निर्माण करू शकाल व स्थानिक राजकारणावरील पकड अधिक मजबूत करता येईल.

**श्री. राजेंद्र भिसे**
युवा, मुंबई

❒❒❒

''प्रशासनासोबत काम कस करायचं हे एक कौशल्य आहे. त्यांच्यावर न चिडता त्यांच्याकडून काम करून घेता येत.''

**श्रीमती भारती देशमुख, सभापती महिला व बाल कल्याण समिती, वसई विरार महानगरपालिका**

''नेहमीच प्रशासन आपलं ऐकत असं नाही. वेळ प्रसंगी प्रशासनाला धारेवर धरावं लागत तेव्हाच आपली कामं होतात.''

**श्रीमती पुष्पा सोनावणे, नगरसेविका सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका**

## शहरनामा

# औरंगाबाद शहर - वाढ की विकास ?

औरंगाबाद शहराचा इतिहास ४०० वर्षाचा जुना आहे इ. १६१० पूर्वी खडकी नावाने ही वस्ती अस्तित्वात होती. १६१० मध्ये मलीक अंबरने हे शहर वसवले. १६५३ मध्ये औरंगजेब बादशहाने ह्या शहराचे नाव 'औरंगाबाद' असे ठेवले असे इतिहासकार नोंदवतात. १६५३ ते १९४७ पर्यंत अनेक ऐतिहासिक घटना ह्या शहरात घडून गेल्याची नोंद इतिहासात आढळते, १९४७ च्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही त्यावेळी हैद्राबाद संस्थानचा भाग असलेले हे शहर हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे प्रमुख केंद्र होते.

आधुनिक औरंगाबाद शहराच्या जडणघडणीत ३ सामाजिक आंदोलनांचा खूप मोठा सहभाग आहे.

१. हैद्राबाद मुक्ती आंदोलन १९४८

२. विकास आंदोलन १९७२

३. मराठवाडा विद्यापीठ नामांवर आंदोलन १९७८ ते १९९४.

हैद्राबाद मुक्ती संग्रामानंतर औरंगाबाद शहर हे मराठवाडा विभागाचे केंद्र म्हणून शासकीय कामाचे केंद्र बनले. विभागीय कार्यालयाच्या स्थापनेनंतर तर महाराष्ट्र राज्याच्या प्रशासनातील एका विभागाचे नेतृत्व हे शहर करत आहे. शहराच्या विकासासाठी या विभागीय केंद्राचे काम मदतगारच ठरले आहे.

१९६२ च्या महाराष्ट्र राज्य स्थापने नंतरच्या पहिल्या निवडणुकीत डॉ. रफिक झकेरिया निवडून आले होते. त्यांच्याकडे मंत्री म्हणून शहर विकास खात्याचे कामकाज होते. त्यांच्या कार्यकालातच औरंगाबाद शहराच्या विकासाचे नियोजन करण्यास सुरूवात झाली यातून नवीन औरंगाबादचे नियोजन सुरू झाले. ही जबाबदारी सिडकोकडे देण्यात आली होती. नवी मुंबई नंतर दुसरा यशस्वी नियोजनाचा प्रकल्प म्हणून सिडको औरंगाबाद ओळखले जाते.

हैद्राबाद मुक्ती आंदोलनानंतर विनाअट महाराष्ट्रात विलीन झालेल्या मराठवाडा विभागाच्या विकासाच्या प्रश्नावर हे आंदोलन उभे राहिले. परभणी कृषी विद्यापीठातील तरूण विद्यार्थांनी केलेले हे आंदोलन संपूर्ण मराठवाड्यात पसरले. ह्या आंदोलनाने ह्या भागाचा विकास कसा होईल, त्याची गती काय असेल ? इ. प्रश्न पुढे आणले. या मुळेच मराठवाडा प्रदेशाच्या विकासाला चालना मिळाली. महाराष्ट्र शासनाच्या योजनांची गती ह्या आंदोलनाने वाढवली. याचाच दृश्य परिणाम म्हणून, चिकलठाणा ही पहिली औद्योगिक वसाहत सुरू झाली.

१९७८ पर्यंत औरंगाबाद हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे शहर म्हणून ओळखले जात होते. औद्योगिक विकासाला चालना मिळालेले, विविध धर्म, जात, भाषा, बोलणारी लोक औरंगाबाद शहरात वास्तव्याला आलेली होती. नवीन औरंगाबाद म्हणून सिडको परिसर विकसित होत होता. १९७० ते १९८० च्या दशकात आशिया खंडातील सर्वात वेगाने वाढणारे शहर म्हणून या शहराची ओळख निर्माण झालेली होती. ह्या पार्श्वभूमीवर मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आबेंडकरांचे नाव देण्यात यावे ही मागणी करण्यात आली. महाराष्ट्र विधीमंडळाने हा एकमुखाने ठराव पारित केला.

विद्यापीठ नामांतरासाठी किंवा विरोधासाठी मोर्चे, जाळपोळ, दगडफेक, बाजारपेठ बंदी अशी अनेक हत्यारे दोन्ही बाजूंनी सतत वापरली गेली. त्यामुळे आंदोलन चालू राहिले, परंतु, विकास आंदोलनानंतर शासनाने जी विकासास पूरक भूमिका घेतली होती त्यात फरक पडला. विकासासाठी विशेषतः औद्योगिक विकासाच्या सोयी सवलती तशाच असूनही सुरक्षिततेच्या मुद्यांवर खाजगी उत्पादक औरंगाबादला येण्यास नाराज राहू लागले. आणि यापूर्वी सुरू झालेले कारखाने या निमित्तामुळे बंद पडू लागले. १९७८ ला सुरू झालेल्या या आंदोलनाचा शेवट १४ जाने १९९४ च्या शासनाच्या विद्यापीठाच्या नामविस्ताराच्या निर्णयाने झाला.

याच काळात औरंगाबाद शहरातील वस्त्यांची वाटणी सवर्ण आणि दलीत अशी होवू लागली त्याचवेळेस शैक्षणिक संस्थांचे वर्गीकरण जात निहाय होवू लागले.

१९९४ च्या नामांतर आंदोलनाच्या समाप्ती बरोबरच १९८६ ते १९९४ ह्या काळात ह्या शहरात हिंदू मुस्लीम तेढ निर्माण झाली. औरंगाबाद शहर भिवंडी, मालेगाव नंतरचे मुस्लीम बहुल लोकसंख्या असलेले शहर आहे. १९८६ ते १९९४ ह्या काळात शहरात हिंदू मुस्लीम दंगली झाल्या. त्याचे दृश्य परिणाम आजही औरंगाबाद शहरात दिसतात. नामांतर आंदोलनामुळे शहरी वस्ती सवर्ण आणि दलीत ह्या हिंदू गटांमध्ये विभागली गेली होती. परंतु हिंदू मुस्लीम वस्त्यांचे केंद्रीकरण हे ह्या धार्मिक दंगलीनंतर सुरू झाले. हिंदु बहुल वस्तीतील मुस्लीम तर मुस्लीम बहुल वस्तीतील हिंदू स्वतःच्या

मालकीची घरे अतिशय कमी किंमतीत विकून आपआपल्या धर्माच्या वस्त्यांमध्ये रहायला गेली. आज औरंगाबाद शहरात हिंदू मुस्लीम धर्मियांच्या संमिश्र निवासी वस्त्या दिसत नाहीत. तसेच सवर्ण दलीत अश्या मिश्र वस्त्याही अगदीच कमी दिसतात. त्यामुळे नवीन वसाहती निर्माण होताना जात व धर्म हे एक प्रभावी घटक बनलेला दिसतो.

औरंगाबाद शहराची ओळख एक झपाट्याने विकसित होणारे शहर म्हणून आहे. औरंगाबाद शहर पूर्वीपासूनच हिमरू शाली, बिद्री वर्कसाठी प्रसिध्द होतेच. परंतु अलिकडच्या काळात बजाज, व्हीडीओकॉन ३ च्या सहभागाने औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळालेली आहे. औरंगाबादच्या वाळुंज आणि चिकलठाणा औद्योगिक वसाहतींमध्ये ७९ प्रमुख औद्योगिक केंद्रात ५२६८ कोटी रूपयांची प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक करण्यात आली असून १६,४६८ कामगार तिथे काम करतात, तर ५ सेझ चे प्रकल्प शासनाकडे प्रस्तावित आहेत तसेच शासनाने चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत १२ एकर जागा आय.टी. पार्क साठी उपलब्ध करून दिलेली आहे.

वर्ष १९५१ मध्ये ५७,९४९ लोकसंख्येचे औरंगाबाद शहर झपाट्याने वाढत आजची लोकसंख्या ११ लाख ७१ हजार झालेली आहे. राज्यातील लोकसंख्येच्या वाढीमध्ये मुंबई, पुणे नंतर औरंगाबाद शहर हे तिसऱ्या क्रमांकावर असणारे शहर आहे. शहरात येणारे नवनवीन प्रकल्प, उद्योगधंदे यातून निर्माण होणाऱ्या संधी या आजूबाजूच्या शहरांना तसेच जिल्ह्यातील अनेक गावांना शहरात रोजगाराच्या संधीसाठी आकर्षित करत आहेत. या शहराला असणारा ऐतिहासिक ठेवा पर्यटन क्षेत्राच्या विकासात भर घालणारा आहे. त्याचबरोबर शैक्षणिक केंद्र बनलेल्या या शहरामध्ये शिक्षणासाठी म्हणून मोठ्याप्रमाणावर येणारा विद्यार्थीवर्ग येथे शिक्षण झाल्यानंतर नोकरीच्या संधी प्राप्त झाल्यामुळे इथे स्थिरावतो आहे. त्यामुळे एकूणच लोकसंख्या वाढीच्या तुलनेत येथील मूलभूत सोयी सुविधांचे प्रश्न गंभीर बनत चालले आहे.

१९८२ मध्ये औरंगाबाद नगरपरिषद आणि सीमेलगतची १८ खेडी मिळून १३८.५ चौ. किमी. क्षेत्राची औरंगाबाद महानगरपालिका अस्तित्वात आली. तसेच २००८ मध्ये हद्दवाढ होऊन आज महानगरपालिका क्षेत्र १४२ चौ. किमी. झाले आहे. या विस्तारलेल्या शहरामध्ये आज शहर नियोजनाचे, घरांचे, पाण्याचे, एकूणच मूलभूत सोयी सुविधांचे क्लिष्ट प्रश्न दिसतात. १९७० ते १९९० च्या काळात औरंगाबाद शहर हे नियोजितपूर्ण शहर म्हणून ओळखले जात होते. यामध्ये सिडको ची प्रमुख भूमिका दिसते.सर्व आर्थिक स्तरातील प्रामुख्याने कामगारवर्गासाठी परवडणाऱ्या दरात घरे त्याचबरोबर मूलभूत सोयी-सुविधा सिडकोने निर्माण केल्या. १४ गृहनिर्माण योजनांमधून साधारण २२ हजार घरे बांधली. या तुलनेत म्हाडाचे योगदान कमी आहे घरांच्या अनुपलब्धतेमुळे झोपडपट्टी, गुंठेवारी या अनौपचारिक घरांचे प्रश्न शहरात निर्माण होत गेले. शहरातील साधारण ३० टक्के लोकसंख्या ही झोपडपट्टी वस्तीमध्ये राहते. महानगरपालिका झोपडपट्टी सुधार योजनांमधून या वस्त्यांमध्ये पाणी, वीज व रस्ते या सुविधांवर खर्च करते. मात्र तेही अपुरे ठरत आहे. विशेष म्हणजे मनपा हद्दीत समाविष्ट केलेल्या १८ खेडी ही झोपडपट्टी? म्हणून घोषित केल्या आहेत.

याचबरोबर गुंठेवारीचा प्रश्न ही तितकाच गंभीर आहे. साधारण ११४ वसाहती या गुंठेवारी प्रकारात येतात. म्हणजेच साधारण १ लाख घरे अनधिकृत आहेत. मूलभूत सोयी सुविधांची स्थिती ही झोपडपट्टी वस्ती प्रमाणेच आहे. एकूणच परवडणाऱ्या घरांच्या उपलब्धतेचा प्रश्न आज शहरात दिसतो. जमिनीचे दर, घरांचे दर सर्वसामान्य जनतेच्या अवाक्याच्या बाहेर गेलेले दिसून येतात.

प्रत्येक शहराप्रमाणेच या शहरात देखील एखाद्या राजकीय पक्षाचे प्राबल्य दिसून येते. गेल्या १५ वर्षापासून शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाची युती सत्तास्थानी आहे. त्यामुळे स्वभाविकपणे महानगरपालिका, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, सिडको, म्हाडा आणि एम.आय.डी.सी. यांच्या कारभारावर अप्रत्यक्षरित्या युतीतील पुढाऱ्यांचा प्रभाव दिसतो. शहरात इंडियन नॅशनल कॉंग्रेसचे मंत्री असल्याने त्यांच्याही सूचना वजा आदेशाचे पालन करताना प्रशासकीय अधिकाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागते. याचा परिणाम एकूण शहराच्या कारभारावर दिसून येतो !

आज महानगरपालिकेमध्ये स्त्रियांसाठीचे आरक्षण आल्यानंतर एकूण संख्येत फरक पडलेला दिसतो. युतीच्या काळा अनेक महिला महापौर व उपमहापौर पदावर विराजमान झाल्या. औरंगाबाद शहराला भेडसावणारा पाणीपुरवठाचा प्रश्न विजयाताई रहाटकर या महिला नेतृत्वाच्या कारकिर्दीत मार्गी लागला. मात्र सर्वसाधारणपणे महिला मदतारांसाठी काही कार्यक्रम, विशेष योजना करण्याची गरज आहे. या जाणिवेचा अभाव दिसतो.

औरंगाबाद शहर आज देशपातळीवर सर्वात जलद वाढणारे शहर अशी नोंद झाली असली तरी झपाट्याने या वाढणाऱ्या शहरापुढे विकासाचे अनेक प्रश्न आव्हांन म्हणून उभी आहेत.

**डॉ. स्मिता अवचार**
सहयोगी प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग
डॉ. बा. आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद

# 'खुले पान'

# दुखणे काय नि उपाय काय !

२०१२ साल संपले ते सगळ्या देशाला हादरवून टाकतच. डिसेंबर २०१२ मध्ये दिल्लीत चालत्या बस मध्ये एका २३ वर्षीय तरूणीवर नराधमांनी बलात्कार केला, तिला प्रचंड जखमी केले आणि तिच्या मित्रासह तिला चालत्या बस मधून फेकून देण्यात आले. या घटनेने देशभरात संतापाची आणि असुरक्षिततेची लाट पसरली. ठिक-ठिकाणी या विरोधात निदर्शने झालीत. तरूण वर्ग, महिला मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरला. दिल्लीत तर प्रचंड संख्येने सुस्थित, शिक्षीत वर्गातील, कॉलेज मधल्या, नोकरी करणाऱ्या मुली-मुलं त्वेषाने, कडाक्याच्या थंडीला न जुमानता दिवसे न दिवस तटून या प्रश्नाबाबत रेटा देत होते.या घटने नंतर अनेक राज्यात घडणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या बातम्या रोज ठळकपणे वर्तमानपत्रात छापून येऊ लागल्या. कुठे बलात्कार, कुठे छेड छाड, विनयभंग तर कुठे बाप भावानेच केलेला मुलीचा लैंगिक छळ.

गेला महिनाभर वर्तमानपत्र - दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या असो, ट्रेन बसचा प्रवास असो, घरा-घरात या घटनेबाबत चर्चा, विश्लेषण होत आहे. फाशी द्या, कडक शिक्षा द्या, कायदे कडक बनवा या मागण्या मोठ्या प्रमाणात केल्या जात आहेत. दुसरीकडे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे की इतके कायदे केले, मुली इतक्या मोठ्या प्रमाणावर शिकू लागल्या, नोकरी - उद्योग करीत आहेत, राजकारणात महिला सक्रीय भागीदारी करीत आहेत आणि तरीही लैंगिक अत्याचार वाढतोच आहे ?

आणि समाजाला लागलेल्या या दुखण्याचे कारण काय, नेमकं कशामुळे ह्या घटना घडत आहेत याचा विचार न करता सल्लेही द्यायला सुरवात झाली आहे. कुणी सांगितले मुलींनी कपडे नीट घाला, तर कुणाच्या मते भारतात सर्व आलबेल आहे. ''इंडिया'' मध्ये प्रोब्लेम आहे, भारतीय संस्कृतीचे संस्कार करायला हवेत. आणखी एकाने सल्ला दिला की असा अत्याचार करणाऱ्याला हात जोडून विनंती करा, त्याला भाऊ म्हणा तर हा प्रकार थांबेल. तर दुसऱ्या सल्लागाराच्या मते पत्नीने फक्त पती बरोबरच बाहेर पडावे नाही तर इतर स्त्री-पुरूष एकत्र समाजात संपर्कात आले तर भडका उडणारच एका जात पंचायतीने तर यावर नामी उपाय सुचविला आहे, तो म्हणजे मुलींचे लग्न वय १८ वरून १६ वर्ष करून टाकूयात. हा सल्ला देणाऱ्या व्यक्ती साध्य-सुध्या नाहीत कुणी खासदार आहे, कुणी राजकीय पक्षाचे पुढारी आहेत तर कुणी स्वतःला संत म्हणवून घेणारे आहेत. इथे एक गोष्ट ध्यानात आलीच असेल की सल्ले कुणाला दिले आहेत तर ज्या स्त्रियांना अन्यायाला सामोरे जावे लागले आहे त्यानांच ! या पुढाऱ्यांनी अत्याचार करणाऱ्यांना काहीच सुनावलेले दिसत नाही.

कायदे कडक करायला हवे असे सर्वच पक्षांचे पुढारी सांगत आहेत. मात्र ज्या राजकीय पक्षाची लोकं, ज्यांच्यावर बलात्काराचे व खुनाचे आरोप आहेत त्यांना तिकीट दिले जाते ते निवडूनही येतात. अशा व्यक्तींना निवडणूक लढविण्यास बंदी का घालता येवू नये ?

ह्या भयंकर गुन्ह्याला शिक्षा देऊन पायबंद बसेल की महिलांना घरात बसविल्यामुळे त्यांच्यावरील अत्याचार थांबतील की समाजात अन्य काही कारणें शोधून त्यावर उपाय शोधावा लागेल. या मुद्याकडे वळण्यापूर्वी या लैंगिक अत्याचाराबाबतचे वास्तव नीटपणे बघायला हवे.

बलात्काराचा संबंध कुठल्या प्रकारचे कपडे घातले एवढ्याशी असता तर ३-४ वर्षाच्या मुली किंवा ६५ वर्षाच्या महिलांवर बलात्कार झाले नसते. अल्पवयीन मुलींवर होणारे लैंगिक अत्याचाराचे प्रमाण खूप आहे, याची नोंद घ्यायला हवी. दुसरा मुद्दा असा आहे की बाहेर असुरक्षितता आहे म्हणून मुलींना घरी बसवा, त्यांची लग्न लवकर करा असे सांगितले जाते. कुटुंबातील, नात्यातील पुरूषांनी घरातील मुलींवर केलेले लैंगिक अत्याचार बरेचदा उजेडात येत नाहीत. गेल्या महिन्यात वडिलांनी व भावाने मुलीवर अनेक दिवस बलात्कार केल्याची डोबिंवलीतील घटना समोर आली. गेल्या वर्षी मुंबईतील काही उपनगरांमध्ये अल्पवयीन मुलींवर बलात्काराच्या व काही ठिकाणी हत्या करण्याच्या १६ घटना पुढे आल्या. यामध्ये दोन सोडल्या तर सर्व मुलींवर ओळखीच्याच व्यक्तींनी बलात्कार केला होता. कुणी शेजारी होता, तर कुणी दुकानदार, रिक्षेवाला,

नातेवाईक म्हणजे घरात ही सुरक्षिततेचा प्रश्न आहेच आणि हे सर्व प्रकार नव्याने सुरू झालेले नाहीत. आज कुणाही चाळीशी पन्नाशीच्या महिलेला जर याबाबत अनुभव विचारला तर बहुतेक जणींना नात्यातील किंवा ओळखीच्या माणसाकडून गैरवागणूकीचा अनुभव आलेला असतो. एवढेच कशाला १५० वर्षापूर्वी ही समाजात काय घडत होते ? १८ व्या शतकामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांना पाटी लावून विधवा महिलांचे बाळंतपणाची सोय करावी लागली होती. म्हणजे ज्या काळात स्त्री ला शिक्षणासाठीही घराबाहेर पडण्याची मुभा नव्हती (प्रामुख्याने वरच्या मानणाऱ्या जातीत) नोकरीचा प्रश्नच नव्हता, जिथे विधवेला अत्यंत कठोर नियम असायचे तिच्यावर बाळंत व्हायची वेळ का येत होती ? घरातील पुरूषच विधवेवर अत्याचार करायचे, आणि तिला दिवस गेले की ती विहीरीत जीव द्यायची किंवा पोट पाडून टाकायला तिला पंढरपूर किंवा काशीला तरी पाठविले जायचे. त्या स्त्रीच्या वाट्याला नरक यातनाच होत्या. यातून महात्मा फुले व सावित्रीबाईंनी त्या विधवांची सुटका केली.

इंडिया आणि भारत अशी विभागणी करणे ही गैर व अवास्तव आहे. महाराष्ट्रात तरी जितक्या निर्भयपणे मुली शहरात एकट्या फिरू शकतात त्यामानाने खेड्यात उशीरा एसटीने प्रवास करणाऱ्या महिलांना भीती वाटते. शेतात काम करणारी बाई, त्यातून दलित-गरीब बाई किती तरी वेळा मालकाच्या वासनेला बळी पडते. शहरी भागात वेश्या व्यवसायसाठी ज्या मुलींना फसवून आणले जाते त्यात ही ग्रामीण भागातील मुलींचे प्रमाण खूप आहे.

म्हणजे ज्या पुढारी-संत-खासदारांनी मुलींना सल्ले दिले, त्यांना हे वास्तव माहित नाही असे समजायचे का ? का त्यांच्या पुरूषी दृष्टीकोणामुळे "स्त्री" वरच सर्व गोष्टींचे खापर त्यांना फोडायचे आहे ?

या सर्व उदाहरणांमधून लक्षात येते की आपल्यापेक्षा दुबळया एकट्या व्यक्तीवर लैंगिक अत्याचार सर्रास केले जातात. शतकानु-शतके केली जातात. आत्ता मात्र घरात नातेवाईकांकडून असा प्रकार घडला तर "खानदान की इज्जत" च्या नावाखाली तो दडपण्याऐवजी पीडित मुलीचे आई-वडिल पोलीसांकडे, महिला संघटनांकडे तक्रार करू लागले आहेत. म्हणून अशा अत्याचाराची नोंद वाढते आहे. पूर्वी त्या मुलीलाच दोषी ठरवून तिचा आयुष्यभर कोंडमारा व्हायचा. आता मात्र आई-वडिल तिच्या पाठीशी उभे राहतात.

आता चर्चा करायला हवी ती समाजात वावरणाऱ्या महिलांवर होणाऱ्या वाढत्या लैंगिक अत्याचाराची व त्याच्या कारणांची आणि ती कशी रोखता येईल अशा उपयांबाबतची शिक्षण, नोकरी, व्यवसायामुळे घराबाहेर पडणाऱ्या महिलांची संख्या प्रचंड वाढली आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला अतिशय गतीने पुढाकार घेऊन जबाबदाऱ्या घेतांना दिसत आहे. हजारों लाखों महिला अनेक तास घराबाहेर राहतात, आपल्या पुरूष सहकाऱ्यांबरोबर काम करतात. ५०-६० वर्षापूर्वी हे शक्य नव्हते. आज महिलांचा वावर एकट्याने जास्त सहजपणे होत आहे आणि त्याचवेळी लैंगिक हल्ले वाढत आहेत. असे विरोधी भासणारे चित्र दिसते, याची कारणें शोधायला हवी...

गेल्या २०-२५ वर्षात झपाट्याने झालेल्या शहरीकरणामुळे, शहर, वस्त्या, सोसायट्या यांच्यातील अनोळखीपणा वेगाने वाढला आहे. यात मोठ्या प्रमाणावर नोकरी-उद्योग करणाऱ्या स्थलांतरितांची भर पडत आहे.

याच काळात देशाच्या वाढत्या आर्थिक विकासाबरोबरच विषमता ही प्रचंड वाढते आहे. एका समाजातील एका गटाकडे चैनीसाठी उधळायला वाटेल तितका पैसा आला आहे तर त्याचवेळी दुसरा गट कंत्राटीकरणामुळे किमान शाश्वत जगण्यासाठी झगडतोय. यातून एक 'सांस्कृतिक असमतोल' तयार होत आहे. गाड्यांमधून अतिशय मोकळेपणाने फिरणारे तरूण-तरूणी आणि गावामध्ये कुटुंब ठेवून आलेले निम्न आर्थिक थरातील कामगार एकीकडे स्त्रियांना दुय्यम मानणारा अतिशय मागास सरंजामी दृष्टिकोण व दुसरीकडे शहरातले चकाकते जगणे, यातून ही सामाजिक विकृती जन्माला येतो.

सिनेमागृहात जाऊन आपण काय पहावे किंवा पाहू नये यासाठी सेन्सॉर बोर्डाची स्थापना केली गेली. मात्र दूरदर्शनवर घरबसल्या सर्व प्रकारचे बीभत्म ओंगळवाणे हिंसक दृश्याचा अखंड भडिमार लहानपणापासून होण्याची सोय केली गेली आहे. त्यापुढे जाऊन सोशल नेटवर्क च्या नावाखाली मुक्त संवाद संचार द्वारा अत्यंत गैर चित्रफिती कुणाला ही बघता येतात. मुलांना मोबाईल फोनवर एम एम एस वर काहीही बघता येते. याचा जो परिणाम होतो त्याचे काय करायचे ?

काही गोष्टींना नकळत किंवा फारसा विचार न करता सामान्य माणूस, मुलींचे पालक ही मान्यता देतांना दिसतात. कुठल्याही

हाऊसिंग सोसायटीत जेव्हा सांस्कृतिक कार्यक्रम होतात तेव्हा जी गाणी लावली जातात, त्यामध्ये अतिशय ओंगळवाणे हातावारे करणाऱ्या शब्दांच्या गाण्यांचा समावेश असतो. त्यागाण्यांवर लहान मुली नाचतात (त्यांना अर्थ ही कळत नसतो) मोठी माणसें टाळ्या वाजवतात. कौतुक करतात. तू चीज बडी है ''मस्त-मस्त'', ''चोली के पीछे क्या है'', ''शीला की जवानी'' सारख्या गाण्याबद्दल कुणालाच आक्षेप वाटत नाही.

आज जिथे प्रत्येक गोष्टीचे मार्केटिंग होते, तिथे स्त्री / पुरूष देहाच्या मार्केटिंगला सर्रास मान्यता मिळते. कॉलजमध्ये एकमेकांना सेक्सी, हॉट म्हणणे हे कौतुकास्पद वाटते याचा राग येत नाही. इथेच स्त्री उपभोगाची वस्तू आहे, हा दृष्टीकोण तयार होऊ लागतो.

शेवटचा एकच मुददा सांगून हे खुले पत्र संपवित आहे. गेल्या ३०-३५ वर्षात मुलींमधील जागृती खूप मोठ्या प्रमाणावर होत आहे महिला संघटना, सरकार, सामाजिक संघटना यांचा त्यात पुढाकार आहे. महिलांसाठी कायदे बनतात योजना येतात. सवलती मिळत आहेत. यातून मुलींची मानसिकता झपाट्याने बदलत आहे. जुनी ओझी टाकून त्या वेगाने कात टाकत आहेत.

मात्र त्यामानाने वयात येणारी मुलं, तरूणं मुलं यांच्याशी सामाजिक स्तरावर, कौटुंबिक पातळीवर संवाद साधला जात नाही. बदलत्या सामाजिक वास्तवामुळे मुलांमध्ये एक प्रकारचे दडपण, गमावल्याची भावना, असुरक्षिततेची भावना तर तयार होत नाही ना आणि मग ही भावना दडपून टाकायला ते जास्त हिंसक, आक्रमक होत आहेत का हे बघायला हवे. तसे असल्यास या तरूण मुलांशी संवाद वेग-वेगळ्या स्तरावर वाढवायला हवा; तर त्यांचा दृष्टीकोण, मानसिक पठडी बदलायला आपण हातभार लावू शकू.

आरोपींवर त्वरित करावाई व्हायलाच हवी. फक्त फाशी देऊन प्रश्न सुटणार नाही. दुखणे नेमके कुठे आहे त्यानुसारच केलेला उपाय लागू पडेल. त्यामुळे अशा घटनांचा निषेध केल्यानंतर जर उपाय करायचे असतील तर नुस्ता गदारोळ करून मुलींनाच दोषी ठरवून प्रश्न सुटणार नाही.

**भारती शर्मा**
महाराष्ट्र महिला परिषद

❐❐❐

## 'महिला संदर्भात काही महत्त्वाच्या कायदेशीर तरतूदी'

**भारतीय दंड संहिता (इंडियन पीनल कोड)**

- **कलम ३७६ :** स्त्रीच्या इच्छेविरूध्द, संमतीशिवाय जर पुरूषाने तिच्याशी संभोग केला, तर ती बलात्कार ठरतो. तसेच संभोग करण्यासाठी जर स्त्रीला जीवे मारण्याची धमकी देऊन जबरदस्ती केल्यास ती देखील बलात्काराचा गुन्हा ठरतो. १६ वर्षाच्या आतील विवाहित स्त्रीवर तिच्या संमतीशिवाय संभोग केल्यास ती ही बलात्काराचा गुन्हा ठरतो. या तरतूदीनुसार बलात्काराच्या गुन्ह्याच्या दोषीस १० वर्ष करावासाची शिक्षा आहे.

- **कलम ३५४ :** कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार, कामाच्या ठिकाणी महिलेबरोबर केली गेलेली छेडछाड, तिचा विनयभंग करण्याच्या उद्देश्याने केलेले कृत्य हा गुन्हा आहे. गुन्ह्याअंतर्गत दोषी व्यक्तीस पाच वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा आहे.

- **कलम ३६६ :** एखाद्या महिलेला लग्नासाठी पळवून आणणे आणि तिच्या संमतीशिवाय अपहरण करणे हा गुन्हा ठरतो. यासाठी सात वर्षे ते आजन्म कारावासाच्या शिक्षेची तरतूद आहे.

# 'आधार केंद्र'
# बृहनमुंबई महानगरपालिका आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांचा संयुक्त विद्यमाने मुंबईत राबविण्यात येणारा एक नाविन्यपूर्ण उपक्रम

आधार - २००९ सालापासून मुंबईत बृहनमुंबई महानगरपालिका आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने नागरी गरिबी निर्मूलनासाठी आणि गरीब महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे.

**आधार केंद्राची सुरुवात -**
**प्रस्तावना :**

७४ व्या घटना (१९९२) दुरुस्तीनुसार ''दारिद्र्य निर्मूलनाचे निरनिराळे कार्यक्रम राबविणे'' ही सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची एक जबाबदारी आहे. मागील अनेक वर्षापासून दारिद्र्य निर्मूलनाचे अनेक कार्यक्रम / योजना वेगवेगळया स्तरावरुन राबविल्या जात आहेत. भारत सरकार द्वारा पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना ही त्यातील एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेचे काही प्रमुख उद्देश आहेत.

- दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना कौशल्य प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार/स्वयंरोजगार मिळविण्यासाठी सक्षम करणे.
- द्रारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तींना/महिलांना गटांच्या माध्यमातून संघटित करुन व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देणे.

प्रशिक्षण व स्वयंरोजगारासाठी कर्ज व अर्थ सहाय्य या माध्यमातून नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी निरनिराळया विभागामार्फत निरनिराळया योजना राबविल्या जातात. या सर्व योजनांमध्ये खालील प्रकारच्या समस्या समान असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते.

- ज्या व्यक्तींना व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते. (उदा. प्लंबर, वायरमन, इ.) त्यांना व्यवसाय सुरु करण्यासाठी जागेचा प्रश्न भेडसावतो. तसेच सर्वसाधारण नागरीकांना अशा प्रशिक्षित व्यक्तीविषयी माहिती नसते. त्यामुळे नागरीक आणि योजनेचे प्रशिक्षित लाभार्थी यांच्यामध्ये दुवा निर्माण करणे गरजेचे आहे.
- स्वयंरोजगार कार्यक्रमांतर्गत अनुदान व बँकेकडून कर्ज मंजूर झाल्यावर संबंधीत व्यक्तींना/गटांना देखील वस्तूंचे उत्पादन, पॅकिंग व विक्री करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध नसणे, पणन तंत्रे (Marketing Techniques) व व्यवस्थापकीय कौशल्य अवगत नसणे, या सारख्या समस्या प्रामुख्याने निर्माण होतात.

व्यवसाय प्रशिक्षण दिलेल्या किंवा स्वयंरोजगार कार्यक्रमांतर्गत कर्ज/अनुदान दिलेल्या सर्व लाभार्थ्यांना त्याचप्रमाणे महानगरपालिका/नगरपरिषदांमध्ये असलेल्या सर्व दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना/महिला गटांना त्यांच्या व्यवसायासाठी कायमस्वरुपी दुकान गाळे विक्री केंद्रे उपलब्ध करुन देणे, कोणत्याही गटाला विक्रीचे तंत्र अवगत असणे शक्य नाही, यासाठी जर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात एक किंवा अधिक सामूहिक सहाय्य केंद्रे सुरु केली तर त्याद्वारे जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांना खालील बार्बीमध्ये मदत करणे शक्य होईल :-

- अशा केंद्रांच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलनाच्या निरनिराळया कार्यक्रमांच्या लाभार्थ्यांना बनविलेल्या मालासाठी प्रदर्शन व विक्रीसाठी बाजारपेठ सोय उपलब्ध करुन देता येईल.
- अशी केंद्रे निरनिराळया व्यवसाय क्षेत्रातील प्रशिक्षित लाभार्थ्यांच्या सेवा नागरीकांना उपलब्ध करुन संपर्क केंद्रे म्हणून जबाबदारी पार पाडू शकतात.

या दृष्टीने सर्व नागरी क्षेत्रात नागरी स्वराज्य संस्थांमार्फत दारिद्र्य रेषेखालील व्यक्ति/महिला गट यांना सामूहिक सहाय्य करण्याच्या दृष्टीने एक किंवा अधिक आधार केंद्रे उघडण्याबाबतचा प्रस्ताव शासनांच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावावर सर्वकष विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला. -

सर्व नागरी क्षेत्रात संबंधित नागरी स्वराज्य संस्थामार्फत दारिद्र्य रेषेखालील व्यक्ति/महिला गट यांना सामुहिक सहाय्य करण्याच्या दृष्टीने एक किंवा अधिक आधार केंद्रे उघडण्यात यावीत.

ती आधार केंद्रे -

- दारिद्र्य निर्मूलनाच्या निरनिराळया कार्यक्रमांच्या लाभार्थ्यांनी बनविलेल्या मालाचे ''विक्री व प्रदर्शन केंद्र'' म्हणून काम करतील.

- विविध व्यवसायात प्रशिक्षित दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आणि सर्वसाधारण नागरीक यांच्यामधील दुवा म्हणून काम करतील. प्रत्येक आधार केंद्रावर विविध व्यवसायात प्रशिक्षित दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची व्यवसायनिहाय यादी (Directory), त्यांच्या संपर्क दूरध्वनीसह तयार करुन ठेवण्यात येईल. नागरीकांनी दूरध्वनीवरुन आधार केंद्राकडे आवश्यक त्या सेवेची मागणी केल्यावर शहराच्या संबंधित भागात वास्तव्य असणाऱ्या व संबंधीत व्यवसाय प्रशिक्षित लाभार्थ्यास आधार केंद्र त्वरीत दूरध्वनी द्वारा त्याची सूचना देईल. तो/ती संबंधीत नागरीकांस आवश्यकतेप्रमाणे सेवा उपलब्ध करुन येईल.
- माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भरावयाचे निरनिराळे कर, जन्म/मृत्यू दाखला मिळविण्यासाठी करावयाचे अर्ज, निरनिराळ्या अनुज्ञप्त्या, परवानग्या मिळविण्यासाठी करावयाचे अर्ज इत्यादिसाठी नागरी सुविधा केंद्र म्हणूनही काम करतील.

याशिवाय स्थानिक गरजेनुसार व जागेच्या उपलब्धतेनुसार अशा आधार केंद्रावर आणखी काही सेवांचा समावेश करता येईल. उदा. पाळणाघर / वृध्द व्यक्तींसाठी इत्यादी यामुळे जास्तीत जास्त नागरीक या केंद्रांमध्ये येतील.

आधार केंद्रांच्या माध्यामातून विविध दारिद्र्य रेषेखालील स्वयंसहाय्यता गटांकडून येणाऱ्या मालाच्या गुणवत्तेविषयी, विविधतेविषयी जागरुक राहून गटांना मार्गदर्शनही करण्यात येईल व त्यांच्या आंतरिक सक्षमीकरणासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात येईल. (सोबत जोडलेला या संदर्भात महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : जीईएन/सुजयो-२००८/प्र.क्र.६९/ नवि-१६मंत्रालय, मुंबई ४०० ०३२., दिनांक ०८ ऑगस्ट, २००८ पहाणे.)

### मुंबईत आधार केंद्राची सुरुवात -

२००९ साली मुंबई महानगरपालिकेने विलेपार्ले (पूर्व) व अंधेरी (पश्चिम) येथे आधार केंद्राची स्थापना केली. प्रस्तुत आधार केंद्राचे संयोजन, आखणी आणि व्यवस्थापन विषयक महत्त्वपूर्ण काम अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांच्याकडे सुपूर्द केले. आधार केंद्र स्थापनेपासून संस्था हे केंद्र यशस्वीरित्या चालवत आहे. आज हे आधार केंद्र मुंबई महानगरपालिका व अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांचा भागीदारी पध्दतीने चालविण्यात येणारा एक नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणून मानला जातो.


### प्रदर्शन केंद्र

शहरातील गरीब महिलांनी वा स्वयं सहाय्यता गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना / वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे हे आधार केंद्राचे प्रमुख कार्य आहे. त्या अनुषंगाने आधार केंद्र व्यवस्थापनात अखिल भारतीय स्थनिक स्वराज्य संस्था, मुंबई यांची कार्यकक्षा आणि भूमिका - 'शोरुम' आणि प्रदर्शन पुढील प्रमाणे आहे.

- **उत्पादने**
  - वस्तू प्रमाणबध्द ठरविणे (Standardisation)
  - आकर्षक वेष्ठन
  - उत्पादनांचे पत / दर्जा (ब्रँडींग करणे)
  - मूल्य वृध्दीसाठी पुरविलेली माहिती (Inputs) वस्तू / उत्पादनांची किंमत / दर ठरविणे.
  - पणन (मार्केटींग) व्यवस्था
  - विविध उत्पादनांची यादी (कॅटलॉग) तयार करणे.
  - प्रदर्शन (दुकानाची सजावट) संस्थांकडून वस्तूंची मागणी प्राप्त करणे.
- **व्यवस्थापन**
  - बृहनमुंबई महानगरपालिकेच्या मदतीने अधिकृत पुरवठादारांची निवड :
  - मनुष्य बळ व्यवस्थापन व प्रशिक्षण
  - उत्पादनांचा साठा व विक्री व्यवस्थापन
  - वस्तू / उत्पादने पुरवठा करणाऱ्या गटांना रकमेचे वितरण
- **प्रोत्साहनकारक उपक्रम (नियोजित / अपेक्षित)**
  - उत्पादने पुरवठा करणारे गट व वैयक्तिक महिला यांच्यासाठी क्षमता बांधणी कार्यक्रम (बृहन मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्याने )
  - बृहनमुंबई महानगरपालिकेच्या साहाय्याने नियतकालीय प्रसिद्धी मोहीम (आधार नावीन्यपूर्ण उपक्रमाबद्दल सर्वांना

## आधार केंद्र - ४ विभाग

**मुंबईतील आधार केंद्राची आखणी आणि आयोजन खालील चार विभागात करण्यात आलेली आहे.**





माहिती देणे)

### आधार केंद्र - प्रदर्शन विक्री केंद्र

आधार केंद्राद्वारे विविध उत्पादने / सेवा यांच्यासाठी पणन सहाय्य उपलब्धता -

आधार केंद्राद्वारे नागरी गरिब महिलांनी व स्वयं सहाय्यता गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना विक्रीसाठी प्रदर्शन व विक्री दालन संस्थेनुसार उपलब्ध करुन देण्यात आले आहे.




प्रस्तुत आधार केंद्रातील विविध घटकाचे काम खालील पध्दतीनुसार चालविले जाते.

आधार केंद्रात प्रदर्शन व विक्री केंद्रातर्फे मुंबई शहर, महाराष्ट्र राज्यातील अनेक शहरे आणि केरळ, गुजराथ, कर्नाटक, माणिपूर, आसाम, इत्यादि राज्यातील गरीब महिला व स्वयं सहाय्यता गटानी बनविलेल्या विविध उत्पादनांना बाजार पेठ व विक्रीची संधी उपलब्ध करुन दिली जात आहे.


### उपजिविका कौशल्य वृध्दी कार्यक्रम

आधार केंद्रातील कार्यक्रमा अंतर्गत 'मार्केट स्कॅन' च्या आधारे शहरातील आवश्यक गरजांनुसार कौशल्य वृद्धी कार्यक्रम आधार केंद्रातर्फे आयोजित केले जातात.

प्रस्तुत घटकाद्वारे खालील कामे केली जातात -

- मार्केट स्कॅन (बाजारात आवश्यक कौशल्यांचे निरीक्षण)
- विविध प्रशिक्षणाची मोड्यूल (विशिष्ट रचना) तयार करणे.
- लाभार्थीची निवड करणे (महानगरपालिके बरोबर)
- महानगरपालिकेतील सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना (२००९) अंतर्गत अर्थसंकल्पीय तरतूद
- कौशल्य प्रशिक्षण (विविध विषयक)

**कौशल्य वृध्दी घटकाचे काम खालील पध्दती नुसार चालविण्यात येते.**




- नियुक्ती व सतत पाठपुरावा
- शाश्वतता (Sustainability)

संपूर्ण उपजिविका कौशल्य वृध्दी कार्यक्रम वरील प्रणाली नुसार आखला व आयोजित केला जातो. यासाठी दारिद्र्य रेषेखालील प्रशिक्षणार्थीची निवड महानगरपालिके कडून केली जाते व संस्थेस प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी यादी दिली जाते. त्यानुसार प्रशिक्षण आयोजित केले जाते.

**सेवा केंद्र**

आधारमधील सेवा केंद्रातर्फे विविध व्यवसायात प्रशिक्षित दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची व्यवसायनिहाय यादी (Directory) त्यांच्या संपर्क दूरध्वनीसह तयार करुन ठेवण्यात आली आहे. नागरीकांनी दूरध्वनीवरुन आधार केंद्राकडे आवश्यक त्या सेवेची मागणी केल्यावर शहराच्या संबंधित भागात वास्तव्य असणाऱ्या व संबधीत व्यवसायात प्रशिक्षित लाभार्थ्यांस आधार केंद्र त्वरीत दूरध्वनी इ. द्वारा त्याची सूचना देते. जेणेकरुन प्रशिक्षित लाभार्थी संबंधीत नागरिकांना आवश्यकतेप्रमाणे सेवा उपलब्ध करुन देतात.

**नागरी सुविधा केंद्र (CFC)**

आधार केंद्रात नागरी सुविधा केंद्रातर्फे माहिती व तंत्र ज्ञानाचा वापर करुन नागरी स्वराज्य संस्थामध्ये भरावयाचे निरनिराळे कर, जन्म/मृत्यू दाखला मिळविण्यासाठी करावयाचे अर्ज, निरनिराळया अनुज्ञप्त्या, परवानग्या मिळविण्यासाठी करावयाचे अर्ज इत्यादीसाठी नागरी सुविधा केंद्र (Citizen Facilitation Centre) म्हणूनही काम करते.

२००९ सालापासून अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई हे आधार केंद्र मुंबई महानगरपालिकेसाठी यशस्वी रितीने चालवत आहे.

मुंबई महानगरपालिकेसाठी चालविण्यात येणाऱ्या प्रस्तुत आधार केंद्र उपक्रमाचा विशेष उल्लेख भारत सरकारच्या आवास आणि शहरी गरिबी उपशमन मंत्रालय यांच्या द्वारे तयार करण्यात आलेल्या राष्ट्रीय शहरी उपजिविका मिशनच्या (NULM) प्रारुप मध्ये प्रामुख्याने उल्लेख करण्यात आलेला आहे. तसेच भारत सरकारने नवी दिल्ली येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय कार्यशाळेत प्रस्तुत आधार केंद्राच्या अनुभवाचे सादरीकरण करण्यासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांस खास पाचारण केले होते आणि आधार या उपक्रमाची प्रशंसा करण्यात आली.

**भागीदारी**

**आधार केंद्र - आखणी, नियोजन, अंमलबजावणी आणि व्यवस्थापनात हितघटकसंस्थांची भागीदारी**

**बृहनमुंबई महानगरपालिका**

- आधार केंद्र - उत्पादने प्रदर्शन / विक्रीसाठी आवश्यक जागा (नाममात्र शुल्काने) फर्निचर उपलब्ध करुन देणे इ.
- अर्थसंकल्पांतर्गत दूरध्वनी, वीज बील, इ. भरण्यात येतात.

**अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई-**

आधार केंद्रातील सर्वांगीण आखणी, नियोजन व्यवस्थापन व हिशोब सर्व घटकांची अंमलबजावणी करण्याकरिता संपूर्ण मनुष्य बळ सहाय्य

- संनियंत्रण
- महानगरपालिकेस अहवाल सादर करणे.



**डॉ. स्नेहा पळणीटकर**
संचालिका, अ.भा.स्था.स्व.संस्था, मुंबई

**राज्यातील महानगरपालिका / नगरपालिकांमध्ये दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांसाठी आधार केंद्रे सुरु करणे .**

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग,**

शासन निर्णय क्रमांक : जीईएन/सुजयो-२००८/प्र.क्र.६९/नवि-१६ मंत्रालय, मुंबई ४०००३२

दिनांक : ०८ ऑगस्ट, २००८

**प्रस्तावना :**

७४ व्या घटना दुरुस्तीनुसार ''दारिद्र्य निर्मूलनाचे निरनिराळे कार्यक्रम राबविणे'' ही सर्व नागरी संस्थांची अनिवार्य जबाबदारी आहे. मागील अनेक वर्षापासून दारिद्र्य निर्मूलनाचे अनेक कार्यक्रम / योजना वेगवेगळया स्तरावरुन राबविल्या जात आहेत. नगर विकास विभागामार्फत राबविण्यात येणारी केंद्र पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना ही त्यातील एक महत्त्वाची योजना आहे. या योजनेचे दोन प्रमुख उद्देश आहेत.

१) दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार/स्वयंरोजगार मिळविण्यासाठी सक्षम करणे.

२) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील व्यक्तिंना / महिलांना गटांच्या माध्यमातून संघटीत करुन व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देणे.

प्रशिक्षण व स्वयंरोजगारासाठी कर्ज व अर्थसहाय्य या माध्यमातून नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी निरनिराळया योजना राबविल्या जातात. या सर्वच योजनांमध्ये खालील प्रकारच्या समस्या समान असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

- ज्या व्यक्तींना व्यवसाय प्रशिक्षण दिले जाते (उदा. प्लंबर, वायरमन, इ.) त्यांना व्यवसाय सुरु करण्यासाठी जागेचा प्रश्न भेडसावतो. तसेच सर्वसाधारण नागरीकांना अशा प्रशिक्षित व्यक्तींविषयी माहिती नसते. त्यामुळे नागरीक आणि योजनेचे प्रशिक्षित लाभार्थी यांच्यामध्ये दुवा निर्माण करणे गरजेचे आहे.
- स्वयंरोजगार कार्यक्रमांतर्गत अनुदान व बँकेकडून कर्ज मंजूर झाल्यावर संबंधीत व्यक्तींना / गटांना देखील वस्तूचे उत्पादन, पॅकिंग व विक्री करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध नसणे, पणन तंत्रे (Marketing Techniques) व व्यवस्थापकीय कौशल्य अवगत नसणे या समस्या प्रामुख्याने निर्माण होतात.

व्यवसाय प्रशिक्षण दिलेल्या किंवा स्वयंरोजगार कार्यक्रमांतर्गत कर्ज / अनुदान दिलेल्या सर्वच लाभार्थ्यांना त्याचप्रमाणे महानगरपालिका/ नगरपरिषदांमध्ये कार्यरत असलेल्या सर्वच दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना/महिला गटांना त्यांच्या व्यवसायासाठी कायमस्वरुपी दुकान गाळे / विक्री केंद्रे कोणत्याही नागरी स्वराज्य संस्थेला शक्य नाही. तसेच प्रत्येक दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीला / महिला गटाला विक्रीचे तंत्र अवगत असणेही शक्य नाही. यासाठी जर नागरी स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात एक किंवा अधिक सामूहिंक सहाय्य केंद्रे सुरु केली तर त्याद्वारे जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांना खालील बाबींमध्ये मदत करणे शक्य होईल :-

- अशा केंद्राच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलनाच्या निरनिराळया कार्यक्रमांच्या लाभार्थ्यांनी बनविलेल्या मालाच्या प्रदर्शन व विक्रीसाठी बाजारपेठ सुविधा उपलब्ध करुन देता येईल.
- अशी केंद्रे निरनिराळया व्यवसाय क्षेत्रातील प्रशिक्षित लाभार्थ्यांच्या सेवा नागरीकांना उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संपर्क केंद्र म्हणून जबाबदारी पार पाडू शकतात.

या दृष्टीने सर्व नागरी क्षेत्रात नागरी स्वराज्य संस्थांमार्फत दारिद्र्य रेषेखालील व्यक्ति / महिला गट यांना सामुहिक सहाय्य करण्याच्या दृष्टीने एक किंवा अधिक आधार केंद्रे उघडण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. सदर प्रस्तावावर सर्वकष विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

सर्व नागरी क्षेत्रात संबंधित नागरी स्वराज्य संस्थांमार्फत दारिद्र्य रेषेखालील व्यक्ति / महिला गट यांना सामुहिक सहाय्य करण्याच्या दृष्टीने एक किंवा अधिक केंद्रे उघडण्यात यावीत. ती आधार केंद्रे -

१) दारिद्र्य निर्मूलनाच्या निरनिराळया कार्यक्रमांच्या लाभार्थ्यांनी बनविलेल्या मालाचे ''विक्री व प्रदर्शन केंद्र'' म्हणून काम करतील.

२) विविध व्यवसायात प्रशिक्षित दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आणि सर्वसाधारण नागरीक यांच्यामधील दुवा म्हणून काम करतील. प्रत्येक आधार केंद्रावर विविध व्यवसायात प्रशिक्षित दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींची व्यवसायनिहाय यादी (Directory) त्यांच्या संपर्क दूरध्वनीसह तयार करुन ठेवण्यात येईल. नागरीकांनी दूरध्वनीवरुन आधार केंद्राकडे आवश्यक त्या सेवेची मागणी केल्यावर शहराच्या संबंधित भागात वास्तव्य असणाऱ्या व संबंधीत व्यवसायात प्रशिक्षित लाभार्थांस आधार केंद्र त्वरीत दूरध्वनी इ. द्वारा त्याची सूचना देईल. जेणेकरुन तो/ती संबंधीत नागरीकांस आवश्यकतेप्रमाणे सेवा उपलब्ध करुन देईल.

३) माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करुन नागरी स्वराज्य संस्थांमध्ये भरावयाचे निरनिराळे कर, जन्म/मृत्यु दाखला मिळविण्यासाठी करावयाचे अर्ज इत्यादीसाठी नागरी सुविधा केंद्र (Citizen Facilitation Centers) म्हणूनही काम करतील.

याशिवाय स्थानिक गरजेनुसार व जागेच्या उपलब्धतेनुसार अशा आधार केंद्रावर आणखी काही सेवांचा समावेश करता येईल. उदा. पाळणाघर / वृध्द व्यक्तींसाठी (Day care Center) इत्यादी यामुळे जास्तीत जास्त नागरीक या केंद्रामध्ये येतील.

आधार केंद्रांच्या माध्यमातून विविध दारिद्र्य रेषेखालील स्वयंसहाय्यता गटाकडून येणाऱ्या मालाच्या गुणवत्तेविषयी, विविधतेविषयी जागरुक राहून गटांना मार्गदर्शनही करण्यात येईल व त्यांच्या आंतरिक सक्षमीकरणासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात येईल.

२ आधार केंद्राचे संचालन व व्यवस्थापन

आधार केंद्र चालविणे ही मुख्यतः प्रत्येक नागरी स्वराज्य संस्थेची जबाबदारी असेल. परंतु हे केंद्र सामाजिक बांधिलकी ठेवून सुव्यवस्थितपणे चालविण्यासाठी एक पूर्णवेळ यंत्रणा असणे आवश्यक आहे. ''माविम'' सारख्या शासकीय संस्था शहरातील समाज विकास संस्था / अशासकीय संस्था (उध) किंवा एखादा सक्षम महिला बचत गट अशाप्रकारचे आधार केंद्र चालविणारी व्यवस्थापन यंत्रणा म्हणून काम करु शकेल. आधार केंद्र चालविण्यासाठी संबंधीत नागरी स्वराज्य संस्था पुढे नमूद केल्यानुसार एक संस्था निश्चित करुन त्यांचे समवेत केंद्र चालविण्यासंबंधीत करार करील.

संबंधित नागरी स्वराज्य संस्थांनी आधार केंद्रासाठी आवश्यक जागा, इमारत, फर्निचर इत्यादी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन द्यावयची आहे. संबंधीत नागरी स्वराज्य संस्थेच्या अर्थसंकल्पांतर्गत उपलब्ध निधीतून अशा केंद्राचे वीज बील, इ. भरण्यात यावे.

३ आधार केंद्र चालविणाऱ्या व्यवस्थापन संस्था निवडीचे निकष

- सदर संस्था संस्था नोंदणी अधिनियम १८६० (Societies Registration Act 1860) अन्वये नोंदणीकृत संस्था किंवा नोंदणीकृत सहकारी संस्था असावी.
- सदर सामाजिक कार्याचा (विशेषतः दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमाचा) किमान तीन वर्षांचा अनुभव असावा. यासाठी नागरी भागातील दारिद्र्य निमूर्लन कार्यक्रमांतर्गत संस्थेचे मागील तीन वर्षात केलेल्या कामाचा अहवाल अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.
- आधार केंद्रांसाठी व्यवस्थापन यंत्रणा निवडतांना शासकिय संस्था / स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या स्वयंसेवी अशासकीय संस्था / समाज विकास संस्था (CDS), सक्षम महिला बचत गट यांना प्राधान्य द्यावे.
- अर्जदार संस्थेने अशा प्रकारचे केंद्र चालविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळाची उपलब्धतता असल्याचे नमुद करुन आधार केंद्र चालविण्यासाठी प्रस्तावित व्यक्तिंची सविस्तर माहिती अर्जासोबत जोडलेली असावी.

- अर्जदार संस्थेचे लेखे सुव्यवस्थीतपणे ठेवले असून मागील किमान तीन वर्षाचे लेखापरीक्षण झालेले असावे.
- अर्जदार सेवाभावी अशासकीय संस्था असल्यास त्याने किमान तीन वर्षापासून महाराष्ट्रात काम केलेले असावे.
- सदर संस्थेस कोणत्याही शासकीय संस्थेने कोणत्याही कारणासाठी काळया यादीमध्ये समाविष्ट केलेले नसावे.
- ''माविम'' सारख्या शासनाने केलेल्या संस्था देखील आधार केंद्र चालविण्यास पात्र राहतील.

४ व्यवस्थापन संस्था निवडीची प्रक्रिया

संबंधित महानगरपालिका आयुक्त/नगरपरिषदेचे मुख्याधिकार यांनी उपरोक्त नमूद केलेल्या निकषांच्या आधारे वृत्तपत्रातून जाहिरात देवून इच्छूक संस्थाकडून अर्ज मागवावेत व योग्य संस्थेची निवड करण्यासाठी एक समिती नेमावी. सदर समितीने योग्य संस्थेची शिफारस करावी. नागरी स्थानिक संस्थेअंतर्गत सक्षम प्राधिकऱ्याच्या मंजूरीने निवडलेल्या संस्थशी आधार केंद्राचे व्यवस्थापन करण्याविषयी करार करण्यात यावा व त्यानुसार आधार केंद्राचे व्यवस्थापन निवडलेल्या संस्थेने करावे. यावर नागरी स्वराज्य संस्थेने तसेच जिल्हा नागरी विकास यंत्रणेने नियंत्रण व देखरेख ठेवावी आणि आधार केंद्राचा नियमित आढावा घ्यावा. आधार केंद्राचे बँक खाते महानगरपालिकेचे संबंधित आयुक्त / नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व केंद्र चालविणारी व्यवस्थापन यंत्रणा यांनी संयुक्तपणे हाताळावे. केंद्र चालविणाऱ्या व्यवस्थापन यंत्रणेकडून संस्था योग्यरितीने चालविले जात नसल्यास पूर्वी केलेला करार रद्द करुन नवीन व्यवस्थापन संस्था निवडण्यात यावी.

५ आधार केंद्र चालविणाऱ्या व्यवस्थापन संस्थेची जबाबदारी

- व्यवस्थापन संस्थेने आपल्या कर्यक्षेत्रातील प्रशिक्षित कारागिरांची व्यवसाय निहाय यादी (Directory) तयार करावी व या यादीतील सर्व व्यक्तींना फोटो असलेले ओळखपत्र द्यावे.
- नागरीकांसाठी आधार केंद्रावर उपलब्ध असलेल्या सेवांची यादी दर्शनी भागात लावावी.
- नागरीकांनी दूरध्वनीवरुन आवश्यक त्या सेवा सुविधा मिळण्याची मागणी केल्यावर शहराच्या संबंधित भागात उपलब्ध असणाऱ्या व संबंधीत व्यवसायात प्रशिक्षित लाभार्थ्यास त्याची सूचना द्यावी. जेणेकरुन तो / ती आवश्यकतेप्राणे संबंधितांस सेवा उपलब्ध करुन देईल.
- निरनिराळया योजनेच्या लाभार्थ्यांकडून आधार केंद्रात कोणता माल किती प्रमाणात उपलब्ध होईल याचा आराखडा तयार करण्यात यावा.
- अशा सर्व उत्पादकांसाठी व मालासाठी कोड निश्चित करावा.
- आधार केंद्राला Bulk Orders मिळविण्यासाठी प्रयत्न करावे व त्याप्रमाणे विविध गटांकडून होणाऱ्या उत्पादनाचे नियोजन करावे.
- ज्या नागरी स्वराज्य संस्थांकडून इंटरनेट सुविधेद्वारे निरनिराळी बीले अदा करण्याची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्या ठिकाणी नगरी सुविधा केंद्र म्हणून काम करण्यासीठी आधार केंद्र येथे किमान दोन संगमक आणि २५६ केबीएस / नोड इतक्या क्षमतेची इटरनेटची जोडणी उपलब्ध करुन देण्यात यावी.

सदर व्यवस्थापन यंत्रणेस विक्री झालेल्या गालावर काही कमिशन (कमाल १०टक्के) आकरणे अनुज्ञेय असेल. याशिवाय नागरी सुविधा केंद्राच्या प्रत्येक व्यवहारामागे नागरीकांकडून शासनाने विहित केलेल्या माल मर्यादेस (रुपये १०/- प्रति व्यवहार) अधिन राहून काही ठराविक सेवा आकार रक्कम व्यवस्थापन यंत्रणेस आकारता येईल.

६ महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाचा एक स्वतंत्र नांव (बँड) विकसीत करणे आवश्यक आहे. यामुळे मालाच्या गुणवत्तेची हमी ग्राहकांना मिळेल. त्यामुळे महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरुपी ग्राहक वर्ग निर्माण होईल. या सर्व केंद्रांसाठी एकच बोधचिन्ह व राज्यभरातील सर्व आधार केंद्रांसाठी एक समान दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करुन

देण्यासंदर्भात शासनस्तरावरुन स्वतंत्रपणे सूचना देण्यात येतील. आगामी कालावधीत अशा केद्रांचे जाळे निर्माण करणे आवश्यक आहे. अशा केंद्रासाठी एक स्वतंत्र संकणक आज्ञावली (Software) तयार करण्यात येईल. याप्रमाणे कोणत्याही शहरात सर्व नागरी सुविधा मिळण्याचे ठिकाण म्हणून अशी आधार केंद्राची ओळख निर्माण होईल.

७ आधार केंद्रासाठी जागा

- आधार केंद्र सुरु करण्यासाठी जागेच्या संदर्भात तीन पर्याय उपलब्ध आहेत.
- रहिवासी भागात असणाऱ्या व वापरात नसणाऱ्या कल्याण केंद्राचा/नागरी स्वाराज्य संस्थेच्या मालकीच्या जागेचा प्राधान्याने विचार करावा.
- नागरी संस्थेने स्वतःच्या निधीतून बांधलेल्या गाळयांपैकी किमान १० टक्के सलग असलेले गाळे या आधार केंद्रासाठी उपलब्ध करुन देण्यात यावे.
- सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत मुलभूत सोयी व सुविधा या घटकातून आवश्यक इतक्या आधार केंद्राच्या इमारतीचे / कायम स्वरुपी दुकान गाळयांचे / विक्री केंद्राचे बांधकाम करता येईल.

आधार केंद्र चालविणाऱ्या संस्थांना सुमारे तीन वर्ष संबंधित महानगरपालिका / नगरपरिषदांनी मदत करणे आवश्यक आहे. पहिल्या वर्षानंतर केंद्र स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने टप्प्याटप्प्याने महानगरपालिका / नगरपरिषदांना आपला सहभाग कमी करता येईल. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय हे राज्य नगरी विकास यंत्रणेच्या माध्यमातून या सर्व प्रक्रियेवर देखरेख ठेवतील. जिल्हा स्तरावर जिल्हा नागरी विकास यंत्रणा देखरेख ठेवील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने
(मनु कुमार श्रीवास्तव)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, परळी, मुंबई ४०० ०३०
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागरपूर
३) उपसंचालक (सुडा), नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई ४०० ०३०
४) सर्व जिल्हाधिकारी
५) सर्व महानगरपालिका आयुक्त
६) सर्व नगरपरिषद मुख्याधिकारी
७) सर्व मंत्रालयीन विभाग
८) मा. मुख्यामंत्री महोद्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
९) मा. राज्यमंत्री (नवि) यांचे स्टाफ ऑफिसर, मंत्रालय, मुंबई
१०) सविव (नवि) यांचे स्टाफ ऑफिसर, मंत्रालय, मुंबई
११) सर्व सह सचिव / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सर्व अपर सचिव / कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) निवडनस्ती (नवि - १६), नगर विकास विभाग.

❒❒❒

नागरी स्थनिक स्वराज्य संस्थांना

''आधार केंद्रातील'' वस्तू थेट खरेदी करण्याची मुभा देणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

शासन निर्णय क्र. जी ईएन/सुजयो-२००९/प्र.क्र. ६९/नवि-१६

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक :- २० ऑगस्ट, २०१०

संदर्भ :- शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. जीईएन/सुजयो २००८/प्र.क्र. ६९/नवि-१६ दिनांक - ८ ऑगस्ट, २००८

**प्रस्तावना**

दारिद्र्य निर्मुलनाचे निरनिराळे कार्यक्रम राबविणे ही सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची अनिवार्य जबाबदारी आहे. मागील अनेक वर्षापासून दारिद्र्य निर्मूलनाचे अनेक कार्यक्रम / योजना वेगवेगळया स्तरावुन राबविल्या जात आहेत. सद्या केंद्र शासनाकडून नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील व्यक्तिंना कौशल्य प्रशिक्षण देवून त्यांना रोजगार/स्वयंरोजगार मिळविण्यासाठी सक्षम करणे तसेच त्यांना संघटित करुन स्वयंरोजगाराकरिता त्यांना अर्थसहय्य करण्यासाठी केंद्र पुरस्कृत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना राबविली जाते. तथापि, अनेक ठिकाणी दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींना व्यवसाय सुरु करण्यासाठी जागेचा प्रश्न भेडसावतो व त्यांनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री करण्यासाठी जागा नसते तसेच नागरिकांना अशा कौशल्य प्रशिक्षण प्राप्त दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींविषयी माहिती नसते. या सर्व समस्या दूर करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती व गट यांच्याकरिता सामुहिक सहाय्य केंद्र म्हणून ''आधार केंद्र'' सुरु करण्याचा निर्णय शासनाने संदर्भीय शासन निर्णयान्वये घेतला आहे. सदर आधार केंद्रे खालीलप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती व गट यांना सहाय्य करतात :-

१) दारिद्र्य निर्मूलनाच्या निरनिराळया कार्यक्रमांच्या लाभार्थ्यांनी बनविलेल्या मालाचे ''विक्री व प्रदर्शन केंद्र'' म्हणून काम करणे.

२) ''लोकसेवा केंद्र'' या स्वरुपात विविध व्यवसायात प्रशिक्षित दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती आणि सर्वसाधारण नागरिक यांच्यामधील दुवा म्हणून काम करणे.

३) माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भरावयाचे निरनिराळे कर, जन्म/मृत्यु दाखला मिळविण्यासाठी करावयाचे कर्ज, निरनिराळया अनुज्ञपत्या, परवानग्या मिळविण्यासाठी करावयाचे अर्ज इत्यादीसाठी नागरी सुविधा केंद्र म्हणूनही काम करणे.

ही आधार केंद्रे समाज विकास संस्था/अशासकीय संस्था/महिला बचत गटामार्फत चालविली जात असून सदर केंद्रे ही शहरातील दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींच्या वस्तू/उत्पादनांच्या विक्रीसाठी, पर्यायाने त्यांचे दारिद्र्य निर्मुलनासाठीच आहेत, आणि त्या वस्तुंचा खप वाढविल्यास त्यांच्या आर्थिक सुव्यवस्थेत भर पडेल व पर्यायाने दारिद्र्य निर्मुलनाच्या कामास मिळेल याचा विचार करता आधार केंद्रातील वस्तुंना बाजारपेठ मिळून त्यांचा खप वाढावा म्हणून आधार केंद्रातील वस्तू नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्राधान्याने खरेदी कराव्यात असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- नागरी भागातील दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांसाठी संबंधित शहरांतील आधार केंद्रामध्ये दारिद्र्य रेषेखालील व्यक्तींनी किंवा महिला गटांनी त्यांच्या कौशल्यातून निर्माण केलेल्या विविध प्रकारच्या वस्तुंपैकी अनेक वस्तू महानगरपलिका किंवा नगरपालिका यांनाही नगरपालिका यांनाही कार्यालयीन वापरासाठी किंवा काही योजनांसाठी उपयुक्त असू शकतात. (उदा. फाईल कव्हर, फाईल बोर्ड,

महानगरपालिका / नगरपालिका शाळांकरिता खडू/वह्या/विद्यार्थ्यांचे गणवेश/बूट, महानगरपालिका/नगरपालिका शाळा, वसतिगृह किंवा रुगणालयामध्ये पुरविण्यात येणाऱ्या भोजनासाठी स्वच्छ केलेले तांदुळ/कडधान्य इत्यादी). अशा आवश्यक वस्तु आपल्या वार्षिक गरजेच्या किंवा वार्षिक तरतूदीत्या २५ टक्के पर्यंत आधार केंद्रातून थेट खरेदी करण्याची मुभा सर्व नागरी स्थनिक स्वराज्य संस्था यांना देण्यात येत आहे. तथापि, तसे करतांना :

१) आधार केंद्रातून खरेदी करवयाची वस्तू ही त्या वस्तुची संबंधित महानगरपालिकेच्या / नगरपालिकेच्या चालू दर करारातील किंमत किंवा चालू दर करार नसल्यास त्या वस्तुची महानगरपालिका / नगरपालिकेअंतर्गत गेल्या वेळेची खरेदीची किंमत आणि आधार केंद्रात सदर वस्तूची विक्रीची किंमत यापैकी जे कमी असेल त्या किंमतीवर खरेदी करण्यात यावी.

२) संबंधित महानगरपालिका / नगरपालिका अधिनियमातील विहित तरतुदीनुसार निविदा न मागविता खरेदी करण्यासंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यांची सदर खरेदीस पूर्व परवानगी घेण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **http://maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१४००८२६१५०५५५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(मनु कुमार श्रीवास्तव)**

सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रसासन संचालनालय, वरळी, मुंबई ४०० ०२५

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

सर्व जिल्हाधिकारी

सर्व महानगरपालिका आयुक्त

महालेखापाल कार्यालय, मुंबई / नागपूर

उपसंचालक (सुडा) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई - ४००० ०३०

सचिव (नवि) यांचे स्टाफ ऑफिसर, मंत्रालय, मुंबई

सर्व सह सचिव /उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, नगरविकास, मंत्रालय, मुंबई

सर्व नगरपरिषद मुख्याधिकारी

सर्व मंत्रालयीन विभाग

❐❐❐

# 'कारभारीण शहराची' चे मुंबईत प्रकाशन





शनिवार दिनांक २२ डिसेंबर २०१२ रोजी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था आयोजित राज्यस्तरीय महापौर परिषदेमध्ये 'कारभारीण शहराची' या द्वैमासिकाचे प्रकाशन झाले. या पहिल्या अंकाचे प्रकाशन नागपूर महानगरपालिकेचे महापौर मा. श्री. अनिल सोले व अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई चे महासंचालक श्री. रणजीत चव्हाण यांच्या हस्ते झाले. या प्रकाशन कार्यक्रमात व्यासपीठावर छायाचित्रात दाखविल्याप्रमाणे (डावीकडून) डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर, संचालिका, अ.भा.स्था.स्व. संस्था, मुंबई, श्री. रणजित चव्हाण, महासंचालक, अ.भा.स्था.स्व. संस्था, मा. श्री. अनिल सोले, महापौर नागपूर / महानगरपालिका, डॉ. (प्रा.) अमिता भिडे, टाटा समाज विज्ञान संस्था, मुंबई आणि श्रीमती भारती शर्मा, महाराष्ट्र महिला परिषद - उपस्थित होते.

# अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, टाटा सामाजिक विज्ञान संस्था व महाराष्ट्र महिला परिषद आयोजित नगरसेविकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यक्रम





शुक्रवार दिनांक ११ जानेवारी २०१३ रोजी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांनी गृहनिर्माण व नागरी गरीबी उपशमन मंत्रालय भारत सरकार यांच्या सहाय्याने 'विभागीय पातळीवरील सामाजिक क्षेत्रातील विविध योजनांचे समन्वयन' या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सांगली व वसई-विरार महानगरपालिकेतील नगरसेविका या प्रशिक्षण कार्यक्रमाला उपस्थित होत्या. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाची ओळख, सभाशास्त्र नियम, महापालिकांचे अंदाज पत्रक व त्यासंबंधी नगरसेवकांचे अधिकार, कर्तव्ये व भूमिका तसेच जी (जेन्डर) बजेट म्हणजे काय व त्या अनुषंगाने नगरसेविकांनी काय करणे अभिप्रेत आहे यासंबंधी अनुभवी व त्या विषयातील तज्ञ व्यक्तींनी सोप्या शब्दात मांडणी केली. याचबरोबर या प्रशिक्षणामध्ये नगरसेविकांच्या प्रत्यक्ष कामाच्या अनुभवावर आधारित खेळाच्या माध्यमातू एक सत्र घेण्यात आले. टाटा सामाज विज्ञान संस्था आणि महाराष्ट्र महिला परिषद यांनी घेतलेल्या या सत्रांमध्ये स्त्रियांना स्थानिक राजकारणाध्ये ५०% आरक्षणाची मिळालेली संधी वापरून आपले सत्तेतील स्थान कसे बळकट करता येईल, महानगरपालिका क्षेत्रात प्रभावीपणे कसे काम करता येईल या संबंधि त्यांचे अनुभव व विशेष प्रयोग याविषयी लिहायला सांगितले. उपस्थित नगरसेविकांनी या सत्रामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेत मतदार संघातील त्यांची कामे सर्वांसमोर मांडली. ५०% आरक्षणामुळे आव्हाने निर्माण झाली असली तरीही संधी नक्कीच वाढल्या आहेत. असा सकारात्मक सूर सर्व सहभागींच्या बोलण्यामधून व्यक्त झाला.

# तयास मानव म्हणावे का ?

ज्ञान नाही विद्या नाही
ते घेणेचि गोडी नाही
बुद्धी असुनि चालत नाही
तयास मानव म्हणावे का ?

दे रे हरी पलंगी काही
पशूही ऐसे बोलत नाही
विचार ना आचार नाही
तयास मानव म्हणावे का ?

पोरे घरात कमी नाहीत
तयांच्या खाण्यासाठीही
ना करी तो उद्योग काही
तयास मानव म्हणावे का ?

सहानुभूती मिळत नाही
मदत न मिळे कोणाचीही
पर्वा न करी कशाचीही
तयास मानव म्हणावे का ?

जोतिष रमल सामुद्रिक हो
स्वर्ग नरकाच्या कल्पनाही
पशुत नाही त्या जो पाही
तयास मानव म्हणावे का ?

बाईल काम करीत राही
ऐतोबा हा खात राही
पशू पक्षात ऐसे नाही
तयास मानव म्हणावे का ?

सावित्रीबाई फुले ।। संदर्भ : काव्यफुले